# एक अविस्मरणीय प्रवास

आकाश माळकर,

अंतिम वर्ष, यांत्रिकी अभियांत्रिकी

प्रवासवर्णन

२–३ दिवस गेले नसतील की महेंद्रने या हंपीच्या प्लानमध्ये अजून काही ठिकाणं जोडण्यास सुरुवात केली. पहिलं ठरलं फक्त हंपी नाही तर सगळं कर्नाटक पिरायचं. मग त्यात हंपी, वायनाड, बँगलोर, बदामी, गोकणण, उडुपी, मंगलोर हे सगळं आलं. पण मग प्लान भलताच वाढत होता आणि ठरलेल्या दिवसांत बसत नव्हता. इतक्यात महेंद्रच्या डोक्यात काय आलं माहित नाही आणि त्याने थेट मुंबई – मुन्नार – मुंबई असा प्लान समोर ठेवला आणि गंमत बघा ज्या हंपीनेया राईडची मुहूतणमेढ रोवली होती तेच ठिकाण वेळ ममळालं तर पाहू असं म्हणून या प्लान मध्ये आम्ही पबचाऱ्या हंपीलाच ऑप्शनला टाकलं. पण गोची अशी झाली की आम्ही दोघेशहाणे सगळीकडे दवंडी पिटवून झालो होतो तक, आम्ही हंपी राईडला चाललो, हंपी राईडला चाललो आणि ते हंपीच नाही म्हणजे सगळीकडे छी थू होणार होती. शेवटी आम्ही दोघांनी आपापल्या बौद्धिक कुवतीप्रमाणे आजवरच्या सवण ट्रिप्सच्या तन योजन कौशल्याचा जोर लावून १६ जानेवारी ते २५ जानेवारी या १० दिवसांच्या काळात मुंबई–म्हैसूर मुन्नार–उटी–कोइम्बतुर–हम्पी–मुंबई असा मस्त प्लान बसवला आणि स्वत:चीच पाट थोपटली. प्लान तर सगळा तयार होता. एकूण अंतर ३००० किलोमीटर पेक्षा जास्तचं भरणार होतं. एवढं मोठं अंतर म्हणजे या पोरांकडे बाईक्स पण तगड्या असणार असं तुम्हाला वाटत असेल, एखादी बुलेट, हहमालयान, काहीच नाही तर ड्युक तरी! मंडळी चुकताय तुम्ही...! माझ्याकडेहोती होंडा युतनकोनण१५० आणि महेंद्रकडे सुझुकी जिक्सर १५०!

हो खरंय, आम्ही १५०CC च्या बाईक्स वरून ही महाराईड करायचा विचार करत होतो. बऱ्याचदा आमच्याही मनात विचार आला की खरंच एवढं करायची गरज आहे? पण पहिल्यापासून हट्टी वृत्ती! ठरलं म्हणजे ठरलं... काहीही करून जायचं! आजवर आम्ही अनेकदा असे बेभरवश्याचे ट्रेक्स, दट्रप्स के ल्या होत्या. पण हे काहीतरी भलतंच धाडस होतं. मात्र इथे आमचा बाईक्स पेक्षा स्वत:वर जास्त पवश्वास होता हेमहत्त्वाचं. आम्ही जेकाही संकट येईल त्याला तोंड देण्यास पूणणपणे तयार होतो. त्यामुळे काय होईल? काय घडेल? या प्रश्नांची भीती मनातून आपसूकच तनघाली. तनघण्याच्या २ दिवसांपूवी गाड्यांवर सपव सिसिंगचे सगळे सोपस्कार पार पाडले. नवीन लाइट्स, मोबाईल होल्डर, पविंडशिल्ड वगैरे लावून माझ्यातून कोनणला मी जरा सजवलंच. सोबतीला एक्स्ट्रा कल्च केबल, इंजिन ऑईल, चेन ल्युब्रकंट ही आणि अशी बरीच राईडसाठी महत्त्वाची असणारी साधने घेतली. सुरक्षेसाठी हेल्मेट, जॅकेक्ट्स आणि अन्य गोष्टी होत्याच. महेंद्रनेसुद्धा त्याच्या जिक्सरवर असेच संस्कार केले आणि अशाप्रकारे आजवर फक्त महाराष्ट्रात घौडदौड केलेल्या आमच्या बाईक्स तयार झाल्या होत्या दक्षिणेत धडकायला!

१६ तारखेला रात्री १० वाजता मुंबई सोडायची असं ठरवलं. आम्ही दोघेही घाटकोपरचे त्यामुळे वेळेतच निघालो. १७ ला रात्री पयंत म्हैसूरला पोहोचायचेहे आमचे लक्ष्य! आमचं हे लक्ष्य जरा असचं होतं, कारण या आमच्या बाईक्स एका दिवसात एवढं अंतर खेचतील का? हा मोठा प्रश्न होता आणि दसुरं म्हणजे आम्हाला सतत बाईक चालवावी लागणार होती, शक्य तितके कमी ब्रेक घेऊन

अखेर असा तनणणय झाला की उद्या दुपारपर्यंत शरीरात किती एनर्जी बाकी आहे त्यावरून म्हैसूर गाठायचं की नाही ते बघू, नाहीच जमलं तर हुबळीला स्टे करू. पण असं घडलं

असतं तर पुढचा प्लान पण घडणार होता आणि आम्हाला प्लान २ चा अवलंब करावा लागणार होता. मात्र आम्ही ती तडजोड करायला देखील तयार होतो. शेवटी जीवाची काळजी पहिली. मोबाईलमध्ये गुगल मॅप चालू केला. मोबाईल स्टँडला लावला. जॅकेट चढवलं. इयर फोन सेट केले. तोंडाला मास्क बांधला. ग्लव्ह्ज घातलेआणि शेवटी हेल्मेट चढवून काच बंद केली. पुढील १० दिवस आम्हाला बाईकवर बसण्यापूवी याच क्रमाचे न चुकता पालन करायचे होते. १० वाजता आम्ही घाटकोपर सोडलंआणि मानखुदण-शिवाजी नगर मागे सवयी प्रमाणे मुंबईच्या ट्रॅफिक मधून वाट काढत एनएच ४८ अथात मुंबई-पुणे/बँगलोर महामागावर आलो. पुण्याच्या दिशेने कुठे ही राईडला, ट्रेकला जायचे असो आम्हा लोकांचा हा पहिला टप्पा. जर सोबतीला मुंबई भरातून कोणी येणार असेल तर सवांनी इथे जमायचं हा नियम. म्हैसूर गाठण्यासाठी पुढील तकमान १२-१५ तास आम्हाला अगदी सरळ याच एनएच ४८ वरूनच सुसाट जायचं होतं. या महामागाची आणि आमची ारिकत होणार होती कर्नाटकातील दावण गेरे येथे, तेथून हा रस्ता सरळ जाणार होता बँगलोरला आणि आम्हाला घ्यायचा होता लेफ्ट म्हैसूरसाठी! पण ततथपयंत पोहोचायला उद्याची दपुार वा संध्याकाळ उजाडणार होती.

तर एव्हाना आम्ही मुंबई पुणे महामागावर येऊन पहिला ब्रेक घेत होतो. आम्ही आजच्या सोशल ममडीयाच्या युगातील पोरं, त्यामुळेस्टोरीज अपडेट करणं तर आलंच. स्टोरी अपडेट केल्यापासून दुसऱ्या तिसऱ्या सेकंदालाच सुरक्षित प्रवासाच्या शुभेच्छा येण्यास सुरुवात झाली. अनेकांना हे स्टेटस अपडेट करणं शो ऑ वाटू शकतं, पण आपण एखाद्या प्रवासाला चाललो आहोत हे अजभमानाने जगाला सांगण्यात चूक ते काय? याची दसुरी बाजू अशी की अशा मोठ्या प्रवासात तुमच्याबद्दलची माहिती तुमच्या जवळच्या लोकांना कळत राहते. देव न करो पण काही झालं तर तुमचं लास्ट लोकेशन तरी माहित पडतं. त्यामुळे खास करून राईड करणाऱ्यांनी आपलं लाइव्ह लोके शन व्हॉट्स अपला कोणासोबत तरी शेअर करून ठेवावंआणि सतत वेळ ममळेल तसेस्टोरीजच्या माध्यमातून आपले अपडेट देत राहावे.

महामार्गावर मुंबई बाहेर पडणाऱ्या ट्रक्स, कंटेनर, व्होल्वो गाड्यांची नुसती वदणळ सुरु होती आणि थांबलेल्या गाड्यातून डोकावणाऱ्या नजरा आमच्यावर आणि भलंमोठं सामान बांधलेल्या आमच्या बाईक्सवर स्थिरावत होत्या. काही जण तर चौकशी पण करायला आहे. कुठे जाताय? किती दिवसासाठी जाताय? म्हटलं, असेच सगळंच्या प्रश्नांना उत्तर देत बसलो तर इथूनच घरी जावं लागेल. म्हणून कश्याबश्या त्या अनोळखी लोकांच्या शुभेच्छा, काळजीवाहू सूचना स्वीकारत पुण्याच्या दिशेन प्रान केलं. रात्रीची वेळ असल्याने आजूबाजूला मनाला भूलवतील अशी काही दृश्य नजरेस पडणार नव्हती. दहा वाजून गेल्यानेरस्ता पूण खाली होता. महेंद्र आणि मी सतत फोनवरून एकमेकांच्या टच मध्ये होतो. ब्ल्यूटूथ दडव्हाईस खरेदी करायचा आमचा विचार होता. पण नंतर वाढतं बजेट पाहून तो विचार बाजूला पडला आणि इयर फोन्सच्या माध्यमातून एकमेकांशी कनेक्ट राहायचं हे जुगाड वापरलं. कधी तो लीड करायचा तर कधी मी आणि अश्याप्रकारे जुन्या मुंबई पुणे हायवेवरून खंडाळा घाटात प्रवेश केला. मुंबईसोबत एव्हाना मुंबईची सुमार दर्जाची थंडी मागे पडली आणि सुरु झाली घाटावरची बोचरी थंडी. थ्रोटलवर अगदी घट्ट पकड असणारे हात आता थरथरू लागले, दात वाजू लागले. अख्ख्या शरीराचा थंडी पासून बचाव करायचा म्हणून आम्ही पुरेपूर काळजी घेतली होती, पण ती हवा ओ, ततला कोण अडवणार? कुठून ना कुठून आत घुसून त्रास देत होती. खंडाळा पार करून लोणावळत प्रवेश केला. महेंद्र एव्हाना पुढे गेला होता. अख्खं शहर गाढ झोपेत होतं. लोणावळत थांबायचं असं ठरवलेलं, पण लोणावळा शहर मागे पडलं तरी महेंद्र कुठे दिसत नव्हता. रस्त्याला काळा कुट्ट अंधार होता. एकही चहाची टपरी सुरु नव्हती. तेव्हा लक्षात आलं की काही सुरु नाही म्हणून हा थांबला नाही. जर तुम्ही खूप साऱ्या राईड सोबत केल्या की असा फायदा होतो. तुम्हाला एकमेकांच्या सवयी कळतात. कानात कोणतं तरी गाणं तकरकीर करत असताना अचानक महेंद्रचा फोन वाजला आणि म्हणाला देहू जवळ हायवेला एक चहाची टपरी आहेत तथे थांबलोय. या फोनने मी त्याच्या सवयीबद्दल लावलेला माझा अंदाज खरा ठरवला आणि मध्यरात्री बरोबर १२ वाजता आम्ही देहू अथात पुण्याच्या वेशीवरच म्हणा न, येऊन पोहोचलो होतो. म्हणजे दोन तासात अंदाजे १३२ किलोमीटर, नॉट बॅड..!

पुन्हा इथे अंगावरचा सगळा संसार उतरवून मस्त चहा

बिस्कीट खाल्लं. गेलेदीड तास आखडलेल अंग जरा मोकळं केलं पुढच्या गोष्टी ठरवल्या आणि हे ठरवता ठरवता महेंद्रला म्हणालो, आता थेट कोल्हापूर गाठू.

तो सुद्धा हो म्हणाला खरा, पण त्याच्या मनात शंका होती. शंका एकच की एवढा ताण आपल्या बाईक्सना सहन होईल का? कारण देहू ते कोल्हापूर जवळपास २६० किलोमीटरचं अंतर होतं. अंदाजे४ ते ५ तास. पण हा हायवे किती जबरदस्त आहेहेवेगळनेसांगायला नको. राईड करताना असे चौपदरी, मोठे आणि सुसाट हायवेममळालेकी त्यावरून जास्तीत जास्त अंतर कमी वेळात गाठायची संधी सोडू नये. कारण इथेच तुम्ही तुमचा वाया गेलेला वेळ भरून काढूशकता. आमच्यासमोर तर सुवणणसंधी होती, कारण आज पवकें ड नव्हता तसेच १२ देखील वाजून गेले होते, त्यामुळे हायवेला ग़िर कमी वाहने असणार होती. अखेर हे महाधनुष्य पेलून पाहायचं ठरवलं, कमीत कमी कंटाळा करून शक्य तितक्या लवकर कोल्हापूर गाठूया तन धाराने पुन्हा एकदा बाईकचा ताबा घेतला आणि अगदी अविश्वसतनयपणे सतत ४ तास बाईकवरचा थ्रोटल कमी न करता, पुणे, वाई, सातारा, कऱ्हाड मागेटाकत ४:३० वाजता कोल्हापूरमध्ये दाखल झालो. जेव्हा पोहोचलो तेव्हा आमचा स्वत:चाच पवश्वास बसत नव्हता की आपण एवढं मोठं अंतर न कंटाळता या कमी सीसीच्या गाड्यांवर रेकॉड ब्रेक वेळेत पूणण केलं. नाहीतर एरव्ही १५० किलोमीटरला ही थांबत थांबत जाऊन ४ तास लावणारी पोरं आम्ही, पण हे लक्ष्य वेगळं होतं....हे ही राईड वेगळी होती.! कोल्हापूरला आलोच आहोत तर नाश्ता करूनच घेऊ म्हणजे परत थांबायला नको असा विचार केला आणि हायवेला रेस्टॉरंट शोधू लागलो. पण कसलं काय? आम्ही जरी लवकरात लवकर कोल्हापूर गाठलं असलं तरी कोल्हापूरकर मात्र कुडकुडणाऱ्या थंडीत छान साखरझोपेचा आस्वाद घेत होते. अखेर आमचं नशीब चांगलं म्हणून म्हणा, हायवे लगतच एका ऑमट पाव वाल्याने नुकतीच आपल्या दिवसाची सुरुवात केली होती. बाजूला पेटत असणाऱ्या शेकोटीची उब अंगात साठवत त्याच्याकडेमस्त २-४ ऑम्लेट हादडले. कोल्हापूरच्या चहाची चव घेतली आणि ती जिभेवर रेंगाळणारी चव चाखत चाखत बेळगावच्या दिशेने घौडदौड सुरु ठेवली.

आम्ही गेल्या ६ तासात ३५० पेक्षा जास्त किलोमीटर पूणणके ले होते. म्हणजे पहिल्या दिवसाच्या ध्येयाच्या ३०% प्रवास! कोल्हापूरहून पुढचा टप्पा बेळगाव जवळपास १२० किलोमीटरचा होता. जसजसे कोल्हापूर सीमेजवळ येऊ लागलो तसतसे कानडी भाषेतील लिकही मध्ये मध्ये दिसू लागले आणि आपला लाडका महाराष्ट्र आता मागे पडणार याची जाणीव झाली. ती जाणीव मनात घर करत असतंच त्या सरळसोट हायवेवर कधी महाराष्ट्र सोडून कर्नाटकात प्रवेश केला कळलंच नाही. हळूहळू तांबडुंटू लागलं होतं. थंडी अजून काहीशी वाढली. रस्ता असधक चांगला, नीटनेटका खड्डेपवरहहत झाला होता. आयुष्यात पहिल्यांदा बाईक वरून दसुऱ्या राज्यात येण्याची ही पिशलिंग काहीतरी वेगळीच होती. आतापयंत रस्त्यावर अगदी सरळ राहणारी नजर नुकत्याच जाग्या झालेल्या आणि सूयणनारायणाच्या प्रकाशात न्हाऊन तनघालेल्या कर्नाटकी सौंदयाला डोळत सामावण्यासाठी चौफेर फिरत होती. इतक्यात हिडकळ जलाशयाजवळ सुयोदयाचं लोभस दृश्य दिसलं आणि इथे फोटो काढण्यासाठी थांबण्याचा मोह आवरला नाही.

सकाळी ७ वाजता आम्ही बेळगावात प्रवेश केला. आलोच आहोत तर बेळगाव किल्ला पाहून घेऊ असं म्हणून बाईक्स शहराच्या दिशेने वळवल्या. शहरात पिरता पिरता नजरेसमोर येऊ लागला तेथील मराठी बांधवांचा कित्येक वषांपासून सुरु असलेला संर्घष. बेळगाव फिरताना एक गोष्ट मनापासून वाटली की हा हिरा महाराष्ट्राच्या शिरपेचात असायला हवा! आम्ही बेळगाव किल्ल्यापर्यंत पोहोचलो खरेपण त्याचं दिशने घेणं आमच्या नशिबात नव्हतं. किल्ल्यात प्रवेशाची वेळ सुरु होण्यास अजून एक दीड तासांचा अवधी होता आणि आमच्याकडे तेवढा वेळ नव्हता. शेवटी नाईलाजानेगाडयांनी पुन्हा एनएच ४८ धरला आणि लवकरात लवकर म्हैसूर गाठण्यासाठी आम्ही सज्ज झालो. कर्नाटकात प्रवेश केल्यावर एका गोष्टीतील एक प्रकषाने जाणवतो. तो एक म्हणजे रस्त्यांची गुणवत्ता! अगदी एकही खड्डा नाही, ना जास्त स्पीड ब्रेकस! त्यामुळे सतत ८०-९० चा स्पीड कायम ठेवणं शक्य झालं होतं. हळूहळू सोबतीला असणारी गाड्यांची गदीही कमी झाली होती. असं वाटत होतं जणू हा पूणण रस्ता आपल्यासाठीच खुला करून ठेवला आहे की काय. आपल्या महाराष्ट्रात फार कमी असे हायवे आहेत जेथे तुम्ही अशा स्पीडने सतत गाडी चालवू शकता आणि म्हणूनच

आम्हा पोरांसाठी तर ही वेगळी पर्वणी ठरली. आम्हीही अगदी पुरेपूर त्याचा लाभ घेतला. पण अशा या मेगा हायवे वर एक उणीव जाणवते ती म्हणजे उजाड आणि तनरस प्रदेश. आसपास पाहण्यासारखं काहीच नाही. त्यामुळे कालांतराने अशी सुसाट गाडी चालवण्याची मज्जा कमी होऊ लागली. सकाळ सरून दुपारचा प्रहरही सुरु झाला होता. हुबळी देखील मागे पडलं होतं. तासाला आम्ही किमान ९०-१०० किलोमीटर पार करत होतो. पण आता शरीरानेही भावांनो थांबा जरा ही साद घालायला सुरुवात केली होती. शरीर थकू लागलं होतं. बाईक चालवून चालवून १२ तास उलटून गेलेहोते. सरळसोट रस्त्याचा अक्षरशः वैताग आला होता. १०० ची स्पीड देखील कमी वाटूलागली. महेंद्र माझ्या मागेच होता. आम्ही खाणाखुणा करून थांबायचं असं ठरवलं. पण हायवेला एक हॉटेल दिसेल तर शपथ. खोटं वाटत असेल तर कधी या मागानेजा...! अहो कित्येक किलोमीटर एक हॉटेल नाहीये. थांबायला एक जागा नाही. एक साधं पेट्रोल पंपही नाही. एव्हाना मनावर पडलेली कर्नाटकची चांगली छबी आता मात्र पुसट होत चालली होती. अखेर बंकापूर या ठिकाणा जवळ हायवेलगतच एक छोटी झोपडी दिसली. कोणाची आहे, काय आहे, कोणी ओरडेल असा कसलाही विचार न करता सरळ आत जाऊन बस्तान मांडायचं ठरवलं थेट एका तासासाठी! भूक मजबूत लागली होती. स्नॅक्स होतेच, पण पेटपूजेची सुरुवात केली महेंद्रच्या आईने घरून तयार करून ददलेल्या थेपल्यांपासून. महेंद्रने तेथे पले बाहरे काढताच त्यावर दोघेही तुटून पडलो. चांगलं पोटभर खाल्ल्यावर आता कुठे तरी आली. आम्ही मुंबईतून निघताना ठरवलं होतं की हुबळी पयंत पाहू अंगात किती ताकद आहे, त्यानुसार म्हैसूरकडे आज रवाना व्हायचं की नाही ते बघू आणि आमचा अंदाज होता की हुबळी पयंत पोहोचायला संध्याकाळ होईल, पण जास्त ब्रेक्स न घेतल्याने आम्ही तकमान २-३ तास आधीच हुबळी मागे टाकू न पुढे आलो होतो. महेंद्र पुढे जाण्यासाठी तयार होता. मी पण तयार होतो. तरी मध्येच काही वाटलं तर जमेल ततथे थांबू असं ठरवून पुन्हा एकदा मुंबईपासून आमच्या सोबत धावत आम्हाला मागण दाखवणारा आमचा सारथी एनएच ४८ पकडला. उरलेला ४०० किलोमीटरचा टप्पा रात्र व्हायच्या आता आरामात गाठू असं आम्हाला आमच्या एकं दर स्पीड वरून वाटत होतं. पण मंडळी हे फक्त वाटलंआणि घडलं काहीतरी वेगळंच. गेल्या १५ तासांपासून शरीराला झोप नाही, वर तळपतं उन आणि बाजूला निमनुष्य भकास पररसर! सगळी एनजी डाऊन झाली होती. ताशी शंभरच्या वेगाने पाळणारे आम्ही आता ताशी ७०-८० वर आलो कारण आतापयंत मनात भरलेला तो एनएच ४८ अचानक खड्डड्यांनी भरला. पूणणहायवेवर काम सुरु होतं, दर ५ मिनिटांनी डायव्हजणन होते. एव्हाना कानात वाजणाऱ्या गाण्यांचाही वीट आला होता.

ह्या स्टेजमधून प्रत्येक राईडर जावच लागतं, जर तो लांबचा पल्ला गाठत असेल तर....अशावेळी मन शांत ठेवणं, सतत चांगल्या गोष्टींचा विचार करणं, शरीर थकलं असलेतरी त्यात कसाबसा जीव ओतणं, तब्बल ३०० किलोमीटर बाकी असतानाही अरेहे काय आलंच...३ तासात पार करू असं सांगणं गरजेचं असतं. जर तुमच्याने हे होत नसेल तर तुम्ही गप्प जेथे हॉटेल मिळेल तेथे थांबलेलंच बरं. आमच्यात मात्र अजूनही खूप ताकद बाकी होती. तरी सुरक्षितता म्हणून आम्ही दर १०० किलोमीटरला थांबून ब्रेक घेत होतो. चॉकलेट्स आणि कॅडबरीज खात होतो. अशा वेळी शरीरातील शुगर लेव्हल संतुलित ठेवणे गरजेचे असते. म्हणून कधीही छोट्या मोठ्या कोणत्याही राईडला गेलात तरी सोबत खूप सारी चॉकलेट्स, कॅडबरीज किंवा इलेक्स्टट्रोल बाळगावे. थकलेल्या शरीराला यातून बरीच उजा ममळते. तर अखेर दरमजल करत आम्ही येऊन पोहोचलो दावणगेरे येथे. संध्याकाळचे ४ वाजले होते. इथून आम्हाला काल पासून सोबत करणारा एनएच ४८ आपला मागण बदलणार होता. पुढे आमचा साथी होता कर्नाटक (स्टेट हायवे/राज्य महामार्ग) ७६! आता एनएच ४८ ची पुन्हा गाठ पडणार होती मुंबईला परततेवेळी! तेव्हा भेटूअसा तनरोप घेऊन आम्ही खऱ्या अथानेप्रवेश केला कर्नाटकात, कारण आतापयंत आम्ही नॅशनल हायवेनेप्रवास केला जो पूणणपणेओसाड प्रदेशातूनच आला. आता स्टेट हायवे सुरु झाल्याने तो ग्रामीण कर्नाटकातून आम्हाला घेऊन जाणार होता आपलं वेगळं रूप दाखवत! आणि तसचं झाल. SH७६ सूरु होताच नजरेस पडू लागली कर्नाटकातील गावं, तेथील बदललेली माणसं, त्यांची भाषा, गावांची सचत्रपवसचत्र नावंआणि एव्हाना रेंगाळलेला आमचा प्रवास पुन्हा रोमांचकारी झाला. हळूहळू रस्त्याच्या बाजूची हिरवाई वाढत गेली. रस्ते



*डोक शांत असेल तर निर्णय चुकत नाहीत अन् भाषा गोड असेल तर मानस तुटत नाहीत.*

नागमोडे होत गेले. त्यामुळे सरळ सरळ चालणाऱ्या बाईक्स देखील कॉर्नर घेत धावू लागल्या. मध्येच एखादी नदी पुलाखालून निघून जायची. तर कधी ती बाजूने आमच्या सोबत धावायची. रस्त्यालगत असलेल्या नारळीच्या, सुपारीच्या बागा पाहून काही ठकाणी तर कोकणाचाही ीील आला. कालपासून ऐकू न ऐकू न डोक्यात जाणारी गाणी आता आसपासचं सौंदयणखुलल्या बरोबर मनाचा ठाव घेऊ लागली. एकं दर आता खऱ्या अथानेसाउथ राईडला सुरुवात झाली होती. दावणगेरे सोडल्यापासून एव्हाना फक्त ११० किलोमीटर झाले होते आणि आम्ही येऊन पोहोचलो पबरूर मध्ये! या ठिकाणाचं नाव बऱ्यापैकी ऐकलं होतं. इथेच एक ब्रेक घेण्याचं ठरलं. एनएच ४८ ला जवळपास दीड तासाच्या आत आम्ही १०० किलोमीटर पूणण करायचो आणि स्टेट हायवेवर ११० किलोमीटरसाठी आम्हाला लागले जवळपास ३ तास. आतमधल्या रस्त्यांमध्ये स्पीड कायम ठेवण्याची थोडी समस्या होतेच, पण इथेच खऱ्या अर्थाने आपण जे पाहायला आलोय तेरूप पाहायला ममळतं. इथून म्हैसूर राहहलं होतं अजून १८३ किलोमीटर म्हणजेतकमान ५ तास. एव्हाना ३ वाजून गेले होते. म्हणजेनाही म्हटलं तरी रात्रीचे८ वाजणार होते. रात्र व्हायच्या आत म्हैसूरला पोहचू, मस्त हॉटेलात जाऊन सामान ठेवून रात्रीचा शहरात एक मारू. या आणि अशा अनेक मनसुबंवर पाणी रलं होतं. आता आम्ही एवढ्या जवळ येऊन मध्येच स्टेकरू शकत नव्हतो, काहीही करून लवकरच म्हैसूरला पोहचायचे हे एकमेव लक्ष्य डोळसमोर ठेवून चाकं पळू लागली. मात्र हे काम नक्कीच सोप्पं नव्हतं. आमचा हा जोश पुढच्या तासाभरातच निवळला कारण संध्याकाळ असल्याने रस्त्यांवर गदी वाढली होती, सारखं एखादं छोटं मोठं गावं यायचं आणि ततथे बाजार भरलेला असायचा. मग त्यातून कशीबशी हॉर्न देत वाट काढावी लागायची. आपण एकतर दुसऱ्यांच्या प्रदेशात आहोत त्यामुळे गदीतून वाट काढताना पवशेष काळजी घ्यावी लागत होती. उगाच कोणाला थोडासा जरी धक्का लागला तरी त्याचं भांडवल करणारी माणसं कुठेही असू शकतात. किलोमीटर हळूहळूकमी होत होतेआणि वेळ मात्र वाऱ्याच्या वेगानेपळत होती. सूर्य लयाला जाऊ लागला. अंधाराचं राज्य सुरु झालं आणि आम्ही अजून होतो ८० किलोमीटर वरून. ६ वाजायला आले असल्याने ७ वाजता पोहोचण्याची आशा मावळली होती.

त्यात दष्कुाळात तेरावा महिना म्हणून की काय सुरु झाला असेके रे-म्हैसूर रोड! अक्षरशः मंगळावर गाडी चालवतो आहेकी काय असं वाटत होतं. एक एक खड्डा ३-४ ु टांचा. इतका खराब रस्ता आहेम्हणजे वाहन सावकाश जातील अशी अपेक्षा, पण कसलं काय? बसवाले, ट्रकवाले, अक्षरशः समोरून कोण येतय की नाही हे न पाहताच ओव्हरटेक करत होते. एखादा रेसिंग गेम सुरु असावा अशी ती पररस्थिती होती आणि त्यात आम्ही दोन मुंबईचे पामर कसेबसे आपलं कौशल्य पणाला लावून शक्य तततक्या वेगाने वाट काढत होतो. सुदैवाने काहीही संकट न येता सुखरूपपणे आम्ही श्रीरंगपटनाला पोहोचलो. येथून म्हैसूर अवघं ३५ किलोमीटर वर आमची वाट पाहत होतं. अंगात अजजबात ताकद नव्हती, खूप झोप येत होती, भूक लागली होती. आम्ही शक्य तततकं शांत राहण्याचा प्रयत्न करत होतो. कुठेते काल निघालो तेव्हा १००० किलोमीटर होते आणि कुठे हे ३५ किलोमीटरवर येऊन पोहोचलो. ही पिशलिंग अधिक दिलासादायक आणि अभिमानास्पद होती. एव्हाना अजून एक महत्त्वाचं काम बाकी होतं, तेम्हणजे आम्ही अजूनही हॉटेल बुक के लं नव्हतं. म्हणून थोडा वेळ थांबून पटकन जेममळेल तेस्वस्तातलं हॉटेल बुक के लं, कारण आम्हाला फक्त एक रात्र झोपण्यासाठी जागा हवी होती. हॉटेल म्हैसूर शहराबाहेर असल्याने अंतर अजून १० किलोमीटरने वाढलं. म्हैसूरला पोहोचलो तेव्हा रात्रीचे ८ वाजले होते आणि हॉटेलात पोचलो कितीला तर ९:३० ला! दीड तास हॉटेल शोधत फिरत होतो. सापडतच नव्हतं, कारण एक म्हणजे रात्रीची वेळ! कुठल्या रस्त्याने आलो गेलो काही कळत नव्हतं. गुगल मॅपनेपुरता पवश्वास घात केला होता. सगळीच दुकानं एव्हाना बंद झाली होती. कोणाकडे चौकशी करावी तर रस्ते पूर्णपणे निमनुष्य होते. शेवटी एका नाक्याजवळ एक माणूस भेटला. पण इथे निमाण झाली भाषेची समस्या. पहिलं हिंदीत विचारून पाहिलं, तो आपला कन्नड मध्ये बोलत होता. मग इंग्रजीत विचारलं तरी तो कन्नड मध्ये बोलत होता. काय करावं काही कळत नव्हतं. इतक्यात त्याने स्वत:च हाताने इशारा करून मला थांबायला सांगितलं आणि अजून एका तरुणाला घेऊन आला ज्याला इंग्रजी कळत होतं. तेव्हा कुठे सुटकेचा तन:श्वास सोडला. त्या भल्या माणसाने योग्य रस्ता दाखवला आणि ९:३० च्या आसपास हॉटेलात येऊन स्थिरावर

झालो. दक्षिणात्यांच्या कडवट भाषाप्रेमाचा मला पहिल्याच दिवशी चांगलाच अनुभव आला. येणारे दिवस भाषेमुळे अजून काय काय अनुभव दाखवणार हा विचार करून धडकीच भरली. या सगळ गोंधळात आमच्या इच्छेप्रमाणे म्हैसूर शहराचा चांगलाच ि रिटका झाला व नजरेला पडलं जगविख्यात म्हैसूर पॅलेस! एवढ्या जवळ आहेच तर पहहलं हे पाहायचं आणि मग मुन्नारकडे निघायचं असं ठरवलं. एवढ्या रात्री सगळी हॉटेल बंद झाल्याने जेवणाची पंचायत झाली होती. सुदैवाने हॉटेल खालीच एका राईस वाल्याचं दुकान सुरु होतं, त्याच्याकडून कर्नाटकातील स्पेशल लेमन राईस हादडून जेबेडवर आडवे झालो ते थेट सकाळी ९ वाजता उठलो.

## एक शिक्षक असाही

ओघळत्या आसवांना बांध घालणारा कर्माला कर्तव्याची अन ध्येयाला कष्टाची सुदर साथ घालणारा

एक शिक्षक असाही...

मनावर घाव घालुन क्षणासाठी कठोर होणारा पण त्याच घावांतुन या दगडाचं साजरं शिल्प कोरणारा हो

एक शिक्षक असाही...

जगाचं ज्ञान शिकवतानाही समोरच्या प्रत्येकाचं जग जाणणारा किंबहुना ते जगायला शिकवणारा

एक शिक्षक असाही...

तत्वांच्या ओलाव्याने माती बांधुन ठेवणार अनुभवांच्या हातांनी तिच्या मार्गीना वळण

देणारा

एक शिक्षक असाही...

स्वतःच्या मुलाप्रमाणे आमचीही काळजी वेणा आमचही उजळावा दिवा म्हणून वाती सारखां जळणारा हृदयात राहनो आमच्या एक शिक्षक असाही...

**संतोष चिदानंद शिवपूजे**
तृतीय वर्ष यांत्रिकी अभियात्रिकी

## मम जीवनतरु फुलवावा

मम जीवनतरु फुलवावा ।। प्रभु.... ।।
सत्संगतिसलिला देई
सद्विचार रविकर देई
वैराग्य बंधना लावी
हे रोप वाढिला लावा ।। मम.... ।।

तू विकार वादळि पाळी
मोहाचे कृमि तू जाळी
श्रद्धेचे खत तू घाली
टवटवित हरित शोभावा ।। मम.... ।।

धैर्याचा गाभा भरु दे
प्रेमाचे पल्लव फुटु दे
सत्कर्मसुमांनी नटु दे
सच्छील-सुरभि पसरावा ।। मम.... ।।

गुंगोत भक्तिचे भृंग
नांदोत ज्ञान-विहंग
कूजना करुत नवरंग
शांतिच्या फळी बहरावा ।। मम.... ।।

बंधूंस सावली देवो
बंधूंस सौख्यरस देवो
सेवेत सुकोनी जावो
हा हेतु विमल पुरवावा ।। मम.... ।।

**शुभम माळी**
अंतिम वर्ष यांत्रिकी अभियात्रिकी


*स्वतःचा विकास करा. ध्यानात ठेवा, गती आणि वाढ हीच जिवंतपणाची लक्षणे आहेत.*

# सौरऊर्जा निर्मिती एक शाश्वत पर्याय

**डॉ. संजय खोत**
प्राचार्य, शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, यड्राव, इचलकरंजी

**समिक्षा**

सध्या वर्तमानपत्रामध्ये महाराष्ट्र राज्याची सौर ऊर्जा वापरासंबंधी धोरण उदासिनता या संदर्भात बातम्या दिसून येतात. त्याबद्दल देशातीत, महाराष्ट्रातील नविकरणीय ऊर्जा वापर, संधी व सत्यस्थिती याविषयीचा उहापोह.


भारत देश स्वतंत्र झाला त्यावेळी म्हणजेच १९४७ साली आपल्या देशाची विद्युतनिर्मिती क्षमता १३६२ MW इतकी होती. आजअखेर २०२० साली तीच क्षमता ३७२ GW (1 GW = 1000 MW) इतकी आहे. भविष्यात वाढती लोकसंख्या, नागरिकरण, औद्योगिकरण यामुळे ही मागणी २०३० पर्यंत ७०० GW पर्यंत म्हणजेच सध्याच्या वापरापेक्षा दुप्पट जावू शकते. सध्या ऊर्जा निर्मितीचे प्रामुख्याने चार प्रकार मोडतात;- १) औष्णीक, २) जलविद्युत, ३) अणुऊर्जा, ४) नविकरणीय ऊर्जा (सौरऊर्जा, पवनऊर्जा इ.) वरील चार प्रकारची क्षमता पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

| निर्मिती प्रकार | क्षमता MW मध्ये | प्रमाण (टक्के) | महाराष्ट्राची क्षमता MW मध्ये | देशाच्या तुलनेत महाराष्ट्रातील प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|
| औष्णीक | २३१४२१ | ६२.१% | १०८४२ | ४.६८% |
| जलविद्युत | ४५६९९ | १२.३% | २५८० | ५.६४% |
| अणुऊर्जा | ६७८० | १.८% | - | ०% |
| नविकरणीय ऊर्जा | ८८७९३ | २३.८% | १८० | ०.२% |
| **एकूण** | **३७२६९३** | **१००%** | **१३६०२** | |

(संदर्भ:- ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, महाजनको)

वरील माहितीप्रमाणे विद्युत निर्मितीकरिता आजही आपण ६२ टक्के औष्णीक विज प्रकारावर अवलंबून आहोत. औष्णीक प्रकल्पामुळे पर्यावरणाचे प्रश्न गंभीर स्वरूप धारण करीत आहेत. दुसरा जलविद्युत हा प्रकार पाण्याच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. त्यामुळे पहिले दोन निर्मिती प्रकारावर आपणास फार काळ अवलंबून राहून चालणार नाही. तिसरा प्रकार म्हणजे अणुऊर्जा पण अणुभट्टीसाठी वाढता जनविरोधामुळे त्यामध्येही वाढीस फार वाव नाही. त्यामुळे सर्वात पर्यावरणपूरक, सुरक्षित प्रकार म्हणजे नविकरणीय ऊर्जा निर्मिती होय.

देशाचा व महाराष्ट्राचा तुलनात्मक अभ्यास वरील तक्त्याच्या आधारे करता असे दिसते की, महाराष्ट्र राज्याची विजनिर्मिती



क्षमता ही देशाच्या तुलनेने फक्त ३.६४ टक्के म्हणजेच नगण्य आहे. याउलट वापर मात्र निर्मिती क्षमतेच्या डबल आहे. महाराष्ट्र राज्य हे विजेसाठी इतर राज्यावर अवलंबून आहे. देशाच्या विजनिर्मितीमध्ये औष्णीक प्रकल्पांचा वाटा ६२ टक्के आहे. महाराष्ट्रात त्याचे प्रमाण ८० टक्के आहे. म्हणजेच आपली महाराष्ट्राची विजनिर्मिती पूर्णत: औष्णीक प्रकल्पांवर अवलंबून आहे असे दिसून येते.

देशाची व महाराष्ट्राची नविकरणीय ऊर्जा निर्मिती स्थिती पाहता भारत सरकारच्या वतीने नविकरणीय ऊर्जा मंत्रालय (MNRE) हे स्वतंत्र खाते देशाच्या अपारंपारिक ऊर्जा धोरणा संदर्भात, जागृती संदर्भात, अंमलबजावणीसाठी काम करते. त्या अंतर्गत सर्व राज्याच्या इतर संस्था (State Nodal -gency) जसे महाराष्ट्रासाठी महाऊर्जा (MED-) यासारख्या संस्था राज्य पातळीवर काम करतात. भविष्यात ऊर्जा निर्मितीचा मुख्य स्त्रोत हा ङ्गसूर्यफ्च राहणार आहे. केंद्र सरकारने प्रत्येक राज्याची भौगोलिक रचना, हवामान, विजेची गरज या आधारे प्रत्येक राज्याला २०२२ पर्यंत सौर ऊर्जा निर्मितीचे उद्दीष्ट ठरवून दिले आहे. केंद्र सरकारने २०२२ पर्यंत एकूण नविकरणीय ऊर्जा निर्मिती उद्दीष्ट १७५ GW ठरवले आहे. त्यापैकी सौरऊर्जेचा वाटा हा १०० GW इतका असणार आहे. १०० GW मधील ४० GW इतका सोलर रूफ टॉप साठी उद्दीष्ट ठरविले आहे.

सदर उद्दीष्ट २०१८ पर्यंत ३.५८ GW इतके पूर्ण झाले होते पण त्यानंतरची माहिती उपलब्ध नसल्यामुळे जरी अंदाजे एकूण ७.०० GW मार्च २०२० पर्यंत गृहीत धरले तर राहिलेले ३३ GW २०२२ पर्यंत कसे पूर्ण करणार. २०२० मधील काही महिने कोविडच्या महामारीमुळे आर्थिक संकटात व आरोग्याच्या दृष्टीने चिंताजनक जात आहेत तसेच २०२१ बद्दल सध्या भाष्य करू शकत नाही. असे असताना ज्या ग्राहकांना सदरचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविणे शक्य आहे, ज्यांना इच्छा आहे त्यांना प्रवाहामध्ये आणून शासनाच्या योजनेनुसार अनुदान मंजूर करून जास्तीतजास्त सौर रूफ टॉप बसविणे गरजेचे असताना शासकीय पातळीवर जेवढ्या प्रमाणात आवश्यक आहेत तेवढ्या प्रमाणात प्रयत्न दिसून येत नाहीत तर इतर राज्यामध्ये महाराष्ट्रापेक्षा अधिक उद्दीष्ट घेवून याचा प्रसार, प्रचार व अंमलबजावणी सुरू आहे.

सदर उद्दीष्ट ठरविताना जनगणना २०११ नुसार आधार घेतला आहे.

**२०११ जनगणना**

| **घरे (दशलक्ष)** | **एकूण घरे ३३० दशलक्ष** |
|---|---|
| १६६ | विज पुरवठा |
| ७६ | रॉकेल |
| १.०८ | सौरदिव्याचा वापर |
| १४० (२०.३० महाराष्ट्र) | कॉन्क्रीट/एस्बेस्टॉस/धातू |
| २३८ (३४.५१ महाराष्ट्र) | (अंदाजे २०२०) |
| १३० (१२.७९ महाराष्ट्र) | दोन किंवा दोनपेक्षा जास्त खोली |

(संदर्भ:- जनगणना २०११ भारत सरकार)

भारतामध्ये १ KW सौर रूफ टॉप साठी १०० स्वे.फुट ते १२० स्वे.फुट इतकी जागा लागते व सदर प्रकल्प वार्षिक १४०० युनिट विजनिर्मिती करतो. याकरिता लागणारी जागा उपलब्ध आहे, फक्त इच्छाशक्तीची आवश्यकता आहे.

देशाला किंबहुना महाराष्ट्राला जास्त प्रमाणात औष्णीक प्रकल्पावरील अवलंबत्व कमी करून इतर प्रदूषण विरहीत नविकरणीय ऊर्जा निर्मितीवर भर दिला पाहिजे.

सौर ऊर्जा निर्मिती प्रकार:- सौर ऊर्जेची विद्युत निर्मिती दोन प्रकारे होते. १) पारेषण संलग्न (On Grid Connected), २) पारेषण विरहीत (Off Grid Connected)

**१) पारेषण संलग्न (On Grid Connected) :-** या प्रकारात पुन्हा दोन उपप्रकार पडतात. र) सोलर नेट मेटरिंग, ल) सोलर ग्रॉस मेटरिंग

र) सोलर नेट मेटरिंग:- या प्रकारात महावितरणचा ग्राहक महावितरणच्या परवानगीने, स्वखर्चाने आपल्या घराच्या/ ऑफिसच्या/इंडस्ट्रीच्या छतावर सोलर विद्युत निर्मिती संच बसवून घेतो. याद्वारे ग्राहकाच्या रोजच्या वापराच्या गरजेनुसार विजनिर्मिती केली जाते. समजा वापरापेक्षा निर्मिती जास्त असेल तर शिल्लक विज नेट मेटरिंगद्वारे पुन्हा महावितरणला पाठविली


*संपूर्ण जग हातात तलवारी घेऊन तुमच्याविरुद्ध उभे ठाकले, तरी ध्येयपूर्तीसाठी पुढे जाण्याची धमक तुमच्यामध्ये आहे.*

जाते. निर्मितीपेक्षा वापर जास्त असेल तर कमी पडणारी विज

महावितरणकडू घेतली जाते. दररोजचा वापर हा दिवस-रात्र एकत्र करून केला जातो, त्यामुळे सौर विद्युत निर्मिती ही रात्रीच्या वापराला धरून केली जाते. रात्री उत्पादन बंद असलेमुळे दिवसा दिलेली विज पुन्हा आपण परत घेवू शकतो. या सर्व देवाण-घेवाणीची नोंद घेवून महावितरण विजबील देते. या प्रकारात आपण जेवढी विज युनिट महावितरणला देवू तेवढे युनिटस् पुन्हा परत कोणत्याही खर्चाशिवाय घेवू शकतो. फक्त मेटरिंग भाडे दरमहा द्यावे लागते. सध्या महाराष्ट्रात या प्रकारची योजना लोकप्रिय झाली असून याची मागणीही प्रचंड प्रमाणात वाढत आहे.

ल) सोलर ग्रॉस मेटरिंग:- या प्रकारात आपण तयार करणाऱ्या विजेला स्वतंत्र मिटर जोडले जाते व ती सर्व तयार झालेली विज महावितरणला पाठवली जाते. आपल्याला वापरावयास लागणारी विजेला स्वतंत्र मेटरिंग बसविले जाते. दरमहा देवाण-घेवाण यांची स्वतंत्र नोंद केली जाते. पण ग्राहकाकडून घेणाऱ्या विजेचा दर हा कमी असतो. तर महावितरणकडून पुरवठा केलेल्या विजेचा दर जास्त असतो. त्यामुळे लोकांचा याकडे ओढा कमी आहे. तसेच वारंवार हणाऱ्या शासकीय धोरणांमधील बदलामुळे ग्राहकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण हत आहे.

**२) पारेषण विरहीत (Off Grid Connected) :-**

या प्रकारात महावितरण कंपनीच्या परवानगीची गरज असत नाही. छतावर संच बसवला जातो. वापर करून राहिलेली विज बॅटरी संचामध्ये साठवली जाते. आवश्यकतेनुसार त्याचा वापर केला जातो. यामध्ये एकूण संचाच्या खर्चातील बॅटरीचा खर्च अंदाजे ५० टक्के जातो. त्यामुळे ही सिस्टीम On Grid च्या तुलनेत महाग पडते. तसेच याचा देखभाल खर्च, पाच वर्षानंतर बॅटरी बदलण्याचा खर्च येतो त्यामुळे Off Grid प्रकाराला मागणी कमी आहे.

**इमारतीसाठी सोलर रूफटॉप योजनेचे फायदे:-**

भारतामध्ये एकूण विज वापराच्या ३३ टक्के विज इमारतीमध्ये वापरली जाते. त्यामध्ये पुन्हा ८ टक्के वापर हा वाणिज्य प्रकारात व २५ टक्के वापर हा घरगुती प्रकारात मोडतो. इमारतीमधील विज वापरामध्ये बरीच पर्यावरणची हानी होते, तसेच ट्रान्समीशन लॉस प्रकारही यामध्ये जास्त आहेत.

शासकीय अभ्यासानुसार असे निदर्शनास येते की, २०३० मध्ये लागणाऱ्या एकूण बांधकामापैकी फक्त ३० टक्के इतकेच बांधकाम उपलब्ध आहे. म्हणजेच अजूनही ७० टक्के बांधकाम करणे गरजेचे आहे. त्यामुळे या बांधकामाचा/छताचा वापर करून सौरऊर्जा निर्मितीला मोठा वाव आहे. त्यासाठी नागरिकांमध्ये जागृती करणे गरजेचे आहे.

**सोलर रूफटॉपमुळे रोजगार निर्मिती:-**

साधारणपणे १ GW सौर ऊर्जा निर्मिती जर सोलर रूफटॉप द्वारे केली तर अंदाजे १०००० लोकांना रोजगार संधी मिळेल. संचाची २०-२५ वर्षे आयुष्यमान धरले तर नियमित देखभालीसाठी कुशल, अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासेल. त्यामुळे या क्षेत्राकडे ऊर्जा स्वयंपूर्णतेबरोबर रोजगार निर्मितीचे साधन म्हणून बघितले पाहीजे.

सोलर रूफटॉपचा पर्यावरणाला होणारा फायदा:-

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये १२८४४४ चण इतकी विजनिर्मिती झाली. त्यापैकी ३३% इमारतीमध्ये वापरली जाते असे गृहीत धरल्यास ४२३८६६ चण वापर होतो. यामुळे कार्बन उत्सर्जन हे ३३९०९२.८ टन इतके होते. त्यामुळे वरील क्षेत्रामध्ये ऊर्जा संवर्धनाला प्रचंड वाव आहे.

**सोलर रूफटॉपचे फायदे:-**

१) पूर्णत: पर्यावरणपूरक

२) कमी देखभाल खर्च

३) परवडणाऱ्या दरात निर्मिती

४) ग्राहकांची विजेबाबत स्वयंपूर्णता

५) देश ऊर्जा स्वयंपूर्णतेमध्ये प्रत्यक्ष ग्राहकाचा हातभार

६) औद्योगिक, शेतीसाठी जादाची विज उपलब्धता

**महावितरण कंपनीची मानसिकता:-**

महाराष्ट्राची एक प्रगत राज्य म्हणून आपली ओळख आहे. आपल्या राज्यामध्ये सर्व प्रकारचे उद्योग कार्यरत असून भारतातील इतर राज्यातील मजूर महाराष्ट्रामध्ये रोजगारासाठी/व्यवसायासाठी

येत असतात. त्याची प्रचिती आपणाला लॉकडाऊनच्या काळामध्ये लक्षात आलेली आहे. लाखो मजूर बऱ्याच राज्यामध्ये जाऊन परत आलेले आहेत. कोणताही व्यवसाय, उद्योग चालविण्यासाठी व वाढविण्यासाठी किफायतशीर दरामध्ये विद्युत ऊर्जा असणे व त्यांच्या गरजेनुसार उपलब्ध करून देणे ही महाराष्ट्र सरकारचीच म्हणजेच महावितरणची जबाबदारी आहे. शासकिय कंपनी/महामंडळे ही नफेखोरीसाठी निर्माण केलेली नसून त्याचा सामान्य माणसांना फायदा व्हावा व रोजगार निर्मिती व्हावी ह्या उद्देशांनी अशी महामंडळे/कंपन्या उभी केलेली आहेत. स्वातंत्र्यानंतर राजकारणामध्ये वावरणारी मंडळी ही फक्त देशप्रेम व मी माझ्या भारतवासियांसाठी कशी मदत करायची या उद्देशांची होती परंतु आता खाजगीकरण व नफेखोरीमुळे सर्वच व्यवसायामध्ये या सर्व विचारांचा विसर पडू लागला आहे.

महावितरण कंपनीकडे स्वत:ची म्हणजे महानिर्मितीची फक्त १३६०२ चथ इतकी क्षमता आहे. महावितरण ही ऊर्जेची मागणी पूर्ण करण्यासाठी जशिप –ललर्शीी मधून विज विकत घेवून वितरण करीत असते. सदरचे दर हे वेळेनुसार ठरत असतात. मागणी वाढली की दरही वाढतात. वितरण कंपनीच्या असहकारामुळे भारतामध्ये बरेच उद्योग जशिप –ललर्शीी माध्यमातून विज विकत घेवून त्याच्या गरजा भागवत आहेत. त्यामुळे विजेची मागणीही कमी होऊ लागली आहे. त्यामुळे वितरण कंपन्याची महागडी विज खरेदी करण्याची गरज नाही. ह्याच जर वितरण कंपनीने आपल्या सर्व ग्राहकांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या जागेनुसार सौर प्रकल्पाला प्रोत्साहन दिल्यास महावितरणकडे हे सर्व ग्राहक राहतील व उपलब्ध होणारी सौर ऊर्जा गरजेनुसार वाणिज्य व शेतीसाठी वापरता येईल. सध्या सौर ऊर्जा गुंवतणुकीनुसार २ ते ३ रू. प्रती युनिट उपलब्ध होत आहे.

सौर प्रकल्पामुळे तांत्रिक व वितरणमुळे सध्या येणारे नुकसान महावितरणाला कमी करता येईल व त्यांच्या उत्पन्नामध्येही अप्रत्यक्ष वाढच होईल. महावितरण आपल्या बऱ्याच ग्राहकांना सवलतीच्या दरात विज पुरवठा करित असल्यामुळे त्यांच्या मनामध्ये भिती आहे कि, महावितरण आर्थिक अडचणीत येईल, महावितरण ज्या ग्राहकांना सवलतीच्या दरामध्ये विज उपलब्ध करून देते त्यांच्या ठिकाणी जागेच्या उपलब्धतेनुसार किंवा त्या गावामध्ये/शहरामध्ये सौर प्रकल्प उभा करून त्यांना विज उपलब्ध करून देऊ शकते.

भारत सरकार इलेक्ट्रीक गाडीसाठी प्रसार व प्रचार करीत आहे व लवकरच इलेक्ट्रीक बाईक/कार मोठ्या प्रमाणात उपलब्ध केल्या जातील. जर ग्राहकाकडे स्वत: घरामध्ये सौर ऊर्जा उपलब्ध असल्यास इलेक्ट्रीक वाहणाचा मोठ्या प्रमाणामध्ये वापर वाढला जाईल. ज्यामुळे आपल्या देशाचा तेल खरेदीवरील ताणही कमी होईल.

**महावितरणसाठी शाश्वत पर्याय:–**

महावितरणला सर्व ग्राहकांच्या सहकार्याने सौर विद्युत निर्मिती शाश्वत योजना राबवू शकते. ग्राहकांच्या छतावर जितकी जागा उपलब्ध आहे त्यानुसार त्यांच्या परवानगीने शासकीय अनुदानामध्ये सौर प्रकल्प बसवून त्यांच्या गरजा भागविणे व राहिलेली शिल्लक ऊर्जा इतर ग्राहकांना देवू शकतो. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये (GW) प्रकल्प उभा करता येतो. ज्यांच्याकडे जागा उपलब्ध नाही अशा ग्राहकांसाठी त्याच गावामध्ये/शहरामध्ये एकत्रित सौर प्रकल्प उभा करून त्यांची गरज भागविली जावू शकते. त्यासाठी त्यांच्याकडून रु ४००००प्रति किलोवॅट किंवा जी बेंचमार्क किंमत असेल ती घेवून त्यांना १४०० युनिट प्रति वर्ष इतकी ऊर्जा २५ वर्षांसाठी मोफत देण्यासंदर्भातचा करार करावा. जेणेकरून ग्राहकांला विज स्वस्तात मिळेल. महावितरण कंपनीला आर्थिक बोजा (ताण) सहन न करताही Public Private Partnership (PPP) नुसार ग्राहकाच्या गुंतवणूकीवर ऊर्जा निर्मिती करता येईल आणि महावितरण कंपनीला (RPO) नविकरणीय ऊर्जा खरेदीचे ९ टक्के उद्दीष्ट २०२२ पर्यंतही पूर्ण करता येईल व सर्वांना २४ तास विज उपलब्ध होईल ज्याचा दर ही माफक असेल.

महावितरण कंपनीने सामाजिक बांधिलकी म्हणून पुढे यावे व फक्त तोटा होतो हा नकारात्मक विचार सोडून महाराष्ट्र व देश उभारण्यासाठी आपला हातभार लावावा ही अपेक्षा.

# दूरदर्शन

**मानसी प्रकाश कुंभार**
तृतीय वर्ष, संगणक अभियांत्रिकी

**माहितीपर लेख**

१५ सप्टेंबर १९५९:- भारतातील पहिली दूरदर्शन सेवा दूरदर्शनचे प्रसारण सुरू

दूरदर्शवरुन पहिले प्रसारण १५ सप्टेंबर १९५९ रोजी आकाशवाणी भवन नवी दिल्ली, या तात्पूरत्या उभारलेल्या स्टुडिओतून करण्यात आले. १९५५ साली दिल्लीत प्रायोगिक तत्त्वावर आकाशवाणीच्या वास्तूत उभारल्या गेलेल्या दूरदर्शन केंदाने निर्मिलेल्या पहिल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण झाले ते १५ सप्टेंबर १९५९ रोजी. पु. ल. देशपांडे हे दूरदर्शनचे पहिले संचालक होते. त्यांनीच टेलिव्हिजनसाठी दूरदर्शन असे नाव सुचवले होते. पु.ल. आणि शिवेंद्र सिन्हा यांनी जो एक तासाचा पहिला कार्यक्रम तयार केला होता, त्यात पपेट शो, वैजयंती माला यांचे नृत्य, भेसळ प्रतिबंधात्मक कारवाईची माहिती अशा लोकप्रबोधन आणि मनोरंजन यांचा मिलाफ साधणा-या घटकांचा अंतर्भाव होता. प्रायोगिक तत्त्वावरचं हे प्रक्षेपण आठवड्यात तीन दिवस दिल्ली परिसरातच पाहता येत होतं- पण ते पाहायला खुद्द दिल्लीकरांकडेही टीव्ही सेट होते कुठे ! त्यामुळे टीव्ही तसा खऱ्या अर्थी दैनंदिन वापरात आला १९६५ मध्येच, त्यामुळे काहींच्या मते तीच सुरवात मानली जाते.

दिल्लीतल्या एकमेव केंद्रापासून सुरूवात झालेल्या दूरदर्शनचा व्याप आता देशभर पसरलाय.दूरदर्शन, भारतीय राष्ट्रीय दूरदर्शन हे जगातील सर्वात मोठे प्रादेशिक (नेटर्वक) जाळे आहे. डीडी -१ ही वाहिनी १०४२ प्रादेशिक ट्रान्समिटर्स पर्यंत याचे जाळे पसरले आहे. देशात ८५ टक्के लोकसंख्येपर्यंत डीडी-१ चे कार्यक्रम पोहेचतात. या व्यतिरिक्त ६५ अतिरिक्त ट्रान्समिटर्स जोडलेले आहेत. भारतीय राष्ट्रीय उपग्रह (इन्सॅट) वर अनेक ट्रान्सपाँडर्स जोडून प्रसारण क्षेत्र वाढविण्यात आले आहे. प्रत्येक राज्यासाठी दूरदर्शनने स्वतंत्र प्रादेशिक वाहिनी दिली. मुंबईत १९७२ मध्ये दूरदर्शन केंद्र सुरू झालं. देशात ४९ शहरांमध्ये दूरदर्शनचे कार्यक्रम निर्मिती केंद्र कार्यरत आहेत.

रंगत खरी वाढली ती १९८२ नंतर, जेव्हा टीव्ही खरोखर 'रंगीत' दिसू लागला. तोपर्यंत 'कश्मीर की कली' आणि 'नवरंग'सुद्धा 'ब्लॅक अँड व्हाइट'मध्येच पाहावे लागले होते. १९८२ च्या एशियाड सामन्याच्या वेळी भारतात दूरदर्शनचे प्रसारण रंगीत असावे असे सरकारला वाटले. त्यामुळे पंतप्रधान इंदिरा गांधींनी

ही कामगिरी भटकर यांच्यावर सोपविली. ब्याऐंशी मध्ये भारतात झालेल्या 'एशियाड' या आशियायी क्रीडा स्पर्धेमुळे भारतातले क्रीडाप्रेम किती वाढीला लागलं हे माहीत नाही; मात्र त्यानिमित्तानं रंगीत झालेल्या टीव्हीचं प्रेम मात्र झपाट्यानं वाढत गेलं हे नक्की !

हमलोग ही भारतातील दूरचित्रवाणी वरून प्रक्षेपित होणारी पहिली मालिका आहे. भारतीय दूरचित्रवाणीच्या वाटचालीतला हा महत्त्वाचा टप्पा. अशोक कुमारद्वारा सूत्रसंचालित आणि मनोहर श्याम जोशीद्वारा लिखित हमलोग मालिकेने तत्कालीन लोकप्रियतेचे उच्चांक मांडले होते. ७ जुलै १९८४ रोजी पहिल्यांदा हिचा पहिला भाग प्रसारीत झाला होता. नटवर्य अशोककुमार बोलत होते, ''...लेकीन बसेसर था कहाँ और किस उलझन में?... मंझलीने माँ को क्या बताया था? कल की सुबह अपने साथ क्या लाने वाली है?... बेखबर तो मैंभी हूँ - पर बेआस नहीं... होता है क्या. कल देखेंगे, 'हम लोग' !''

त्यानंतर हिंदीतल्या बुनियाद, ये जो है जिंदगी, रजनी, तमस, रामायण, महाभारत, द वर्ल्ड धिस वीक, दर्पण या मालिकांनी तर मनोरंजनाच्या विश्वात अफाट प्रेक्षक वर्ग मिळवला. 'रामायण' व 'महाभारत' या दोन महाकाव्यांचा भारतीय मनावरचा चिरंतन ठसा या दोन महामालिकांनी पुन्हा एकदा उजळला. १९८७ ते १९९० या चार वर्षांत या मालिकांचं जनमानसावरचं जे गारुड दिसलं, त्यानं 'टीव्ही' या माध्यमाची अक्षरशः विस्मयित करणारी ताकदच दाखवून दिली. रविवारी सकाळी या मालिकांवेळी देशभर जणू 'कर्फ्यू' लागणारी परिस्थिती होती.

१९८५ नंतर घरोघरी दूरचित्रवाणी संच दिसू लागले आणि उंच अँटेना डजेस्ट करीत 'मुंग्या-मुंग्या' हा नवा शब्द मराठीला देत टीव्ही- मोजक्या का होईना- मराठी घरांमधून दिसू लागला. मालिकांविषयीच्या चर्चा रंगू लागल्या. चिमणराव आणि गुंड्याभाऊ, चाळ नावाची वाचाळ वस्ती, गोट्या, बंदिनी, एक शुन्य शुन्य, सर्जा राजा, प्रतिभा आणि प्रतिमा, ज्ञानदीप, आमची माती आमची माणसं या मालिका ज्ञान, माहिती आणि निखळ मनोरंजन देण्याचं काम करीत होत्या. व्यत्यय नावाची पाटीही चांगलाच भाव खावून जायची. ज्यांच्या घरात स्वतःची किमान स्कूटर किंवा घरात फोन होते त्यांच्या घरी 'ईसी' टीव्ही पोहचला. 'ईसी' ही टीव्ही संच निर्मिती करणारी पहिली 'स्वदेशी' कंपनी. पुढे यथावकाश क्राऊन, फिलिप्स, डायनोरा वगैरे 'ब्रँड्स' हे दिसू लागले. सोसायट्या, चाळी व वस्त्यांमधून अशी 'टी.व्ही.'धारक घरे सार्वजनिक बनू लागली.

आठवड्यातून एकदा रविवारी दिसणारा सिनेमा आणि गुरुवारी दिसणारे अर्ध्या तासाचे 'छायागीत' खरोखरीच 'हाऊस'फुल्ल करू लागले. धरधन्याच्या फुटकळ विनोदांना भरभरून हसून दाद देणं किंवा घरातल्या शेंबड्या मुला-मुलीचं अमाप कौतुक करणं, हे त्या घरात टीव्ही पाहायला किमान टेकण्यासाठी सोयीस्कर भिंतीलगतची जागा मिळवण्यासाठी आवश्यक ठरू लागलं ! यातूनच दिवाळी पाडवा, गुढीपाडवा, न्यू इयर आदी तत्सम सुमुहूर्तावर 'हप्त्यानं' का होईना; पण 'आपला' टीव्ही आणण्याचे मनसुबे आणि हट्ट स्त्रीशक्ती घरोघर करू लागली.

१९९१ मध्ये त्याच्या 'स्टार इंडिया'चं पदार्पण झालं, ९२ मध्ये 'झी'ची हिंदी वाहिनी दिसू लागली आणि या पावलांनी 'खासगी चॅनेल्स'नी आपल्या घरातही प्रवेश केला... सोनी, शार्प, सॅनसुई, पॅनासोनिक, सॅमसंग, एलजी, तोशिबा वगैरे दडपून टाकणारी नावं 'डाऊन पेमेंट' व 'ईएमआय' अशा मध्यमवर्गीयांना हव्याहव्याशा वाटू लागलेल्या संकल्पना घेऊन दाराशी उभी होती. त्यापाठोपाठ घरमालक, किराणेवाला, दूधवाला, पेपरवाला या मासिक जमा-खर्चातल्या उजवीकडच्या बाजूत 'केबलवाला' हा नवा देणेकरी दाखल झाला होता. आज त्याच्याही पुढे जाऊन 'केबल कनेक्शन' मागं पडून त्यांनी 'डायरेक्ट टू होम' प्रवेश मिळवला आहे.

आजघडीला चढत, त चॅनेल, म्युझिक चॅनेल्स हे सर्व असले तरी आजही 'सॉर्ड ऑफ टिपू सुलतान'ची भव्य सुरवात करणारी संगीतकार नौशाद यांनी बनवलेली 'सिग्नेचर ट्यून' आजही तेवढंच रोमांच उभी करते. नाग बंधूंची 'मालगुडी डेज',चंद्रकांता,ब्योमकेश बक्षी,तेनालीरामा, जंगल बुक, विक्रम और वेताल,सर्कस, फौजी अशा सर्व थरांना आवडून गेलेल्या 'कथात्मां'ची मालिका 'स्वाभिमान' या पहिल्या डेली सोपपर्यंत पोहचलेल्या मालिकांची सर आजच्या हायफ़ाय कपडे घालून, श्रीमंतीचा थाट दाखवणार्या मालिकांना नाही.

# अघोर अंत

रोहन कुमार कुंभार

अंतिम वर्ष, परमाणू व दूरसंचार अभियांत्रिकी

कथा

जखोबा...? जयदेव धावतच जखोबाजवळ पोहोचला तोपर्यंत त्यांच्या पायाचा त्या काळोखातून आलेल्या उपद्रवाने लचका तोडला होता वेदनेच्या कळा त्यांना अगदी असाह्य झाल्या होत्या. बघता बघता आता संपूर्ण वाडा काळोखात बुडून गेला होता उरला सुरला प्रकाश होता तो फक्त कडकडनाऱ्या विजांचा... तसे तो गडी देखील जखोबाच्या दिशेने धावत आला त्यानेही जखोबाचा एक हात खांद्यावर घेतला व जखोबाला आधार दिला.. मालक...आव काय झाल ह्ये...आता इथन बाहेर कस निघायचं आपण...? त्याच्या चेहऱ्यावर भय अगदी स्पष्ट दिसत होते... तीíííí....तो इथे नाहीये...त्याचा मुहूर्त आहे...आणि शेवटचा बळीदेखील... जखोबा जयदेवकडे पाहत म्हणाले... म्हणजे संध्या ? संध्याच्या जीवाला धोका आहे...

होय...! माझ्या पोरीच्या जीवाला धोका आहे. जखोबा कण्हतच बोलून गेले...ते ऐकून मात्र जयदेवची मानच आश्चर्याने त्यांच्याकडे वळली... काय ? तुम्ही...म्हणजे तुम्ही संध्याचे सख्खे वडील आहात ? म्हणजे....म्हणजे संध्याची आई तुमची...

हो ती माझी सर्वस्व होती परंतु या नराधमाने तिला आणि माझ्या होणाऱ्या पोरीला हिरावून घेतले माझ्यापासून...अतोनात यातना दिल्या त्याने माझ्या सावित्रीला...माझी सावित्री...! जखोबाच्या चेहऱ्यावर दुख , दुःख, वेदना स्पष्ट जाणवून येत होते..

जखोबा...! इथून वाड्यातून बाहेर निघण्याचा नक्कीच कुठला न कुठला मार्ग असेल तो आपल्याला शोधायला हवाय...! नाहीतर आपल जिवंत राहणे अगदीच अवघड होऊन जाईल... चला इथून...!

होय मालक ! चला लवकर...! तो गडी म्हणाला...जयदेव आणि त्याने जखोबाला चालायला आधार दिला...जयदेवने एका हातामध्ये आपले खिशातील लायटर काढून पेटवले तेवढाच एक प्रकाश त्यांना अगदी आधार देणारा वाटू लागला होता...वाड्याच्या आवारातून त्यांनी काढता पाय घेतला...ओसरीवरच्या अंधारात पायऱ्या चढत चढत तिघेही वाड्याच्या कोपऱ्यातून प्रत्येक खोली उघडून पाहू लागले...जर नशिबाने एखाद्या खोलीची खिडकी उघडी असेल तर त्यामधून बाहेर पडता येईल...जयदेव जातील त्या प्रत्येक खोलीस उघडून पाहू लागला पण आतमध्ये किर्र काळोखाशिवाय दुसर काहीही नव्हत...आता खालच्या मजल्याची एकच खोली बाकी राहिली होती. जयदेव तीहि उघडून पाहण्यासाठी तिच्या जवळ पोहोचला त्याने दरवाज्याला हात लावलाच होता कि तेवढ्यात थांबा जयदेव...! जखोबाने त्याला आडवले... जखोबाने मागे वळून संपूर्ण वाड्याची एकवेळ टेहाळणी केली जखोबास संशयाची सुई टोचली होती. काहीतरी वेगळ आहे खूप वेगळ आहे... जखोबा म्हणाले... म्हणजे ? काय म्हणायचंय तुम्हाला जखोबा ? जयदेवने जखोबाला विचारले... हे अस होऊच शकत नाही... कुठल्याहि खोलीमध्ये एकही खिडकी नाहीये...! हे शक्यच नाहीये...हा...हा भ्रम आहे...जयदेव हा भ्रम आहे चकवा आहे हा.

मग आता...हे ओळखायच कसे कि खरा मार्ग कुठून आहे... ? कुठ दडला आहे तो मार्ग कसे कळणार आपल्याला ? जयदेव म्हणाला जखोबादेखील विचारात पडले... या भ्रमाचा तोड एकाच वाक्यात केला आहे... अशी गोष्ट जी प्रकाशात

उपस्थित असून देखील त्याचे किरण त्या गोष्टीला स्पर्श करू शकत नाहीत.

काय ? म्हणजे ? हे काय आहे काय असू शकते ती गोष्ट आणि आता तर प्रकाश हि नाहीये त्या गोष्टी...

हि ही ही ई...संपती मार्ग सर्व,
काळोख दाटुनी येती,
संकटे चहूदर पसरती
रक्त तुझ ते सांडून वाहती
मांस कचलचक्यात तुटती..

किडे पडतील हो तुला किडे प्रेताला तुझ्या कुठे जाशील... जयदेव जखोबाच्या कानावरती तो आवाज पडला... तो आली....धाव जयदेव धाव... जखोबा जयदेवला ढकलतच धावण्यासाठी सांगत हात लावणार होते कि जखोबाला आपल्या शेजारी फक्त पोकळी जाणवली जसे जवळ कुणीही उभे नाहीये...इकडे जयदेव हि न जाणे स्वतःला कुठल्या दिशेत अडकलोय हे पाहत होता. आणि तिघेही एकमेकांपासून आता वेगळे झाले होते. माया घडली होती काळ पिसाळलेल्या श्वापदासारखा वाड्यात जबडा वासून फिरत होता त्याच्या हुकुमावरून सैतान सुटला होता भक्ष्य शोधत आपल्या सावजावर आघात करून प्रहार करून त्यांची शिकार...करून त्यांना ठार मारण्यासाठी तो सज्ज झाला होता. मायाचक्र, धुकेरी वलये नजराणा अंध करत होती मेंदूच्या विचारचक्रांना तात्पुरते ग्रहण लागले होते दिशेच भान नव्हत धरती सरळ कि उलटी कळत नव्हते.. पाऊले मात्र कशावरती तरी टेकले आहेत हे जाणवत होत...

मालकी ???? मालक वाचवा...मलीकी.... वाड्याच्या भिंती जणू एके जागी बसून फक्त रक्तरंजित तमाशाचा मृत्यूच्या भयंकर खेळाचा आस्वाद घेत होत्या... मार्ग मिळत नव्हता रात्र अजून विषारी होऊ लागली... जखोबा जयदेव दोघांच्याहि कानावर एक जीवघेणी आर्त किंकाळी पडली..ती किंकाळी वाड्याच्या बाहेरपर्यंत पोहोचली... हे काय होत ? संध्या विश्वास दोघेही विहिरीच्या अगदी काठावर येऊन ठेपले होते...विश्वासने दारावरचा कंदील काढून सोबत घेतला आणि त्याच्या प्रकाशात खाली विहिरीमध्ये पाहिले जाळ्यानमुळे आतमध्ये काय होत हे दिसण मुश्कील होत कंदिलाचा प्रकाश हि तिथपर्यंत पोहोचत नव्हता...विश्वासच्या नजरेस तेव्हा त्या विहिरीत जायच्या पायऱ्या दिसल्या... संध्या...? विश्वासने एकवेळ संध्याकडे पाहिले...त्याच्या नजरेमध्ये तिला जणू निरोपच दिसून येऊ लागला. विश्वास काही बोलणार होताच कि संध्याने त्याच्या ओठांवर आपला हात ठेवला...नकाराने मान हलवली... नाही...बोलू नकोस....बस एवढच कर....जे मी पाहिले ते खोटे ठरव...माझ्यासाठी आपल्या अनुसाठी तुला परत यायचं आहे... विश्वासने संध्याचा हात हाती घेतला... हो...! मी येईन...! मी परत येईन...! विश्वासने संध्याचा हात आपल्या हातातून सोडवला निजलेल्या अनुचा माथ्यावर हात फिरवून विश्वास हातात कंदील घेऊन खाली त्या विहिरीच्या पायऱ्यावरून उतरत रस्त्यात आडवे येणारे जाळे काढत थोड खाली जाताच खडखड असा आवाज झाला विश्वासने तो आवाज ऐकला आणि पुढचे पाउल टाकलेच कि तोच त्याच्या पायाखाली असलेल्या एका दगडाचा भुगा भुगा झाला आणि विश्वासचा पाय सटकला... विश्वासने कसाबसा आपला तोल सांभाळला...त्या क्षणी मात्र विश्वासला असे वाटले आपण आता खोलवर खाली पडणार पण तुटलेले दगड खाली त्या विहिरीच्या तळाशी जाताच पाण्याचा डबकण आवाज झाला..पण जरा वेळ घेऊन तो आवाज आला विश्वास समजून गेला कि पाणी जास्त खोल नाहीये. एक एक पायरी उतरत विश्वास खाली त्या अंधारात जाऊ लागला...

गण्या...? जखोबा त्या गड्याची किंकाळी ऐकून हादरून गेले होते.जयदेव जागीच पावसाच्या धो धो कोसळत्या थेंबामध्ये जमिनीवर आपले दोन्ही गुडघे टेकून बसला... जखोबाने आपले दोन्ही हात पाठ मागे कशाच्या तरी आधारे टेकवले...पापणीत आसवाचे थेंब ओघळून गालावरती येत होते. सावित्री...मला माफ कर...! मी हरलो...! आज आपली मुलगी मला मिळाली आणि मी तीच साध रक्षण करू शकत नाहीये...! मार्ग दाखव सावित्री...! मार्ग दाखव...! जखोबानी आपले दोन्ही डोळे बंद करून सावित्रीचा चेहरा समोर आणला...आणि अचानक एक कडकडकरणारी वीज वाड्याच्या माथ्यावर आसमंतामध्ये चमकू लागली...तब्बल तीन वेळा अगदी ठराविक कालावधी अंतराने ती वीज अवकाशात कडाडू लागली जखोबाने ते पहिले...इकडे जयदेवने आपली नजर वरती केली... हा लखख

प्रकाश...! जयदेव त्या विजेकडे पाहतच राहिला... अशी एक गोष्ट जी प्रकाशात उपस्थित असते... जयदेवास जखोबाचे ते शब्द ते पद्य ऐकू येऊ लागले त्याच्या डोक्यात ती गोष्ट वारंवार घुमू लागली... अशी गोष्ट....जी...जी..प्रकाशात उपस्थित आणि...आणि....अस्पर्श्य किरणानी.... तोच जयदेवने विचारात गुंतवलेले आपले डोळे खाडकन उघडले जणू त्याला त्याच उत्तरच मिळाले होते जयदेवाचा चेहऱ्यावर जणू विजयाच हास्य उमटले आसमंतात कडाडणाऱ्या विजेंच्या थयथयाटीखालीच जयदेव उभा राहिला...आणि त्याच्यापासून काही दूर अंतरावर खुद्द काळ येऊन उभा राहिला होता गोविंदपंताचा हुकुमी गुलाम अघोऱ्या आता आपल्या भयंकर रुपात अवतरला होता जयदेवने एकवेळ अवकाशात पाहिले विजेंच्या लखलखाटीचा त्याने वेध घेतला आणि आपल्या चारीही बाजूनी नजर फिरवत जयदेव पाहू लागला...तशी पहिली वीज कडाडली जयदेवने पहिले तेच मायावी दरवाजे तेच भ्रम पुनश्चः उभे राहिले होते. जयदेवला कळून चुकले होते मार्ग सापडला होता आता फक्त वेळ बाकी होती ती म्हणजे मृत्यूशी शेवटची झुंज देण्याची त्याला चुकवण्याची...जयदेवकडे फक्त शेवटचा एकच पर्याय एकच मार्ग उरला होता... जी प्रकाशात उपस्थित पण अस्पर्श्य अशी किरणास...म्हणजेच छा..या...!

विश्वासने अखेरीस विहिरीच्या तळाशी आपले दोन्ही पाय ठेवले...कंदिलाच्या प्रकाशात विश्वासने खाली उतरून पाहिले कि कांबरेएवढे पाणी त्या विहिरीच्या तळाशी साचले होते हिरवट शेवाळ आलेले अगदी कुबट , सडके व घाणेरडे आणि त्याच्याहून जास्त तीव्र असा घाणेरडा वास जसे एखादे मृतदेहच तिथे सडत आहे. विश्वासने आजूबाजूस नजर फिरवली विहिरीमध्ये अगदी अनुकुचीदार दगडे रोवले गेले होते जर वरतून कोणी एखादे खाली कोसळले तर त्याची गाठ थेट मृत्यूशीच...त्या सोबतच विश्वास कंदील घेऊन पुढे पुढे सरकू लागला पायाखाली गाळ,चिखल येत होता...विश्वास विहिरीच्या अगदी मधोमध येऊन उभा राहिला अजून पुढे सरकणार तोच विश्वासच्या पायाशी काहीतरी ठेचकाळले..कदाचित दगड होता तो विश्वासने त्यावरती आपले पाउल टाकले तोच विश्वासला जाणवले कि तो दगड ओबडधोबड नसून अगदी सपाट असा बसण्याच्या आसनासारखा होता विश्वासने हातातला दिवा वरतीच धरला...एक जोरदार श्वास घेऊन विश्वासने त्या पाण्यात मनाविरुद्धच बुडी घेतली...दिव्याच्या वरच्या प्रकाशाने तळाला असलेल्या गोष्टी किंचित नजरेस पडत होत्या..विश्वासने तसे आणखीन खाली जात एका हाताने दिवा पाण्याबाहेरच धरला व हाताने तिथल्या चिखलामध्ये गाळामध्ये आपला हात घातला पण श्वास अपुरा पडल्याने विश्वास पाण्यातून बाहेर आला.... जोरजोरात श्वास घेत विश्वासने नाकातले तोंडातले पाणी थुंकून बाहेर काढले...विश्वास परत एकदा खाली जाणार होता त्या साठी त्याने आपला श्वास परत एकदा रोखला होताच कि...विहिरीच्या भिंतीच्या बाजूकडून एक आवाज विश्वासच्या कानावरती येऊन पडला... बुडबुड ..... जसे कि पाण्यातून कसल्यातरी मोठ्या बुडबुड्याच निघाल्या होत्या. विश्वासने पाहिले तसे अचानक त्या थांबल्या...विश्वासला ते भासले कि तिथे पाण्यामध्ये काहीतरी वावरत आहे...विश्वासने परत एकदा श्वास रोखला आणि अजून एक त्याने पाण्यात बुडी मारली यावेळी गाळामध्ये विश्वासने खोलवरती हात घातला, तर त्याच्या हातास काहीतरी लागल काहीतरी कपडा काहीतरी कठीण अस विश्वासने हात घालून ते गाळातून बाहेर उपसण्याचा प्रयत्न केला....पण ते एका हाताने निघणे अशक्य होते विश्वासला....अखेरीस विश्वासने हातातील दिवा तिथे पाण्यात सोडून दिला विश्वासच्या हातामधून जसा दिवा निसटला तसे... पाण्यात चारीही बाजूनी बुडबुड्या उठायला सुरुवात झाली...विश्वास बाहेर निघाला त्याने पाहिले कि आपल्या चारीही बाजूनी काहीतरी जवळजवळ येत आहे...तोच अचानक विश्वास आपोआप पाण्यात खाली खेचला गेला... आहो...संध्या....संध्या.... हि तीच विहीर होती ज्या मध्ये गोविंदपंताने न जाणे कितीतरी कोवळ्या मुलींचे निर्घृण रित्या बळी दिले होते त्यांचेच अतृप्त गुलाम बनून राहिलेले आत्मे विश्वासला आता नजरेसमोर दिसू लागले....एक एक करून त्या सर्वानीच विश्वासला घेरले...इकडे अचानक जोरदार पाउस सुरु झाला होता वरती संध्याने अनुला आपल्या पदराने झाकून घेतले होते गावातला जमाव अजून हि बऱ्याच अंतरावर होता.आतमध्ये असलेला दिवा चटकन विझलेला पाहून संध्याला धडकीच भरली.... विश्वास??? विश्वास ? संध्या विहिरीच्याकडेवरून विश्वासच नाव जीवाच्या आकांताने घेत त्याला बोलावत होती... विश्वास...?? तोच त्या विहीरजवळ बांधलेलं गोविंदपंताचे

काळे अघोरीमंत्र आपल्या जागेवर एका काळसरधुरातून प्रकट झाले...दोन्ही हात वाढवून आता ते थेट संध्याच्या दिशेने येत होत तिला त्या विहिरीमध्ये ढकलून द्यायला.....

जयदेवने आपल्या भोवती नजर फिरवली विजेच्या कडकडाटीमध्ये त्याने पाहिले कि कुठल्याहि दरवाज्यावरती त्याची छाया त्याचे प्रतिरूप त्याची सावली पडताना दिसून येत नव्हती कारण ते सर्व मार्ग मायावी होते...सत्य कधीच दडून राहू शकत नाही वास्तविकता नेहमीच उघड होते. जयदेव...! शोध शोध...तुझी सावली कुठल्या दरवाज्यावरती पडेल तोच असेल इथून सुटकेचा मार्ग...जयदेव...चल.. आणि अखेरीस जयदेवाचा अंदाज अगदी खरा ठरला आणि अवकाशात तिसरी वीज कडाडली आणि जयदेवच्या नजरेस अखेरीस तो मार्ग पडला ज्याच्यावरती त्याची गडद आणि महाकाय छाया परावर्तीत झाली...आणि त्याच क्षणी अघोऱ्याने चवताळून आपल्या जागेवरून जोरदार धाव घेतली मृत्यूचे दोन्ही हात पसरवून...एका घासातच अघोऱ्या जयदेवाचा अंत करणार होता...जयदेवने त्याच्याकडे पाहिले आणि अगदी चपळाईने त्यादरवाज्याच्या दिशेने धाव घ्यायला सुरुवात केली अघोऱ्याने दोन तीन ढांगामध्येच जयदेवला गाठलं होत वेळेची गती जणू सेकंदाचे दहा सेकंद होऊन मंदावली...जयदेवने जी चपळाई दाखवली अघोऱ्याने घाव घातलाच होता आपल्या शिकारीवर प्रहार केलाच होता कि जयदेव धावता धावता र्स्रर्क्न गुडघ्यावर खाली मुडपला तोच जमिनीवरच्या पावसाच्या पाण्यानी जयदेव घसरत धडपडत थेट दरवाज्याच्या दिशेने घरंगळत गेला...इकडे सावज हुकले, शिकार चुकली चवताळलेल्या अघोऱ्याने जमिनीवर पाय टेकवले आणि थेट जयदेवला मारण्यासाठी त्याच्याकडे धावत सुटला त्याच्या हुकुमाचा आवाज परत एकदा त्या वाड्यात घुमला... धर त्याला...मार....मूर्खा....मार त्याला पकड.... गोविंदपंताचा हुकुमच होता तो परंतु अखेरीस जयदेव त्या दरवाज्यात पोहोचलाच...जसे जयदेवाने त्या दरवाज्यास स्पर्श केला त्याचक्षनी गोविंदपंतांनी मांडलेले मायाजंजाळ एखाद भल मोठ कवच ताडकन फुटाव असे जागीच तुटून गेले...जयदेवने दरवाजा उघडताचक्षणी वाड्यातील एक एक दिवा एक एक कंदील झप झप झप करत पेट घेऊन उजळू लागले....इकडे जखोबानी आपले डोळे उघडून आजूबाजूला आपली नजर फिरवली तेव्हा त्यानाही आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेनासा झाला... त्याला समजले....त्याने करून दाखवले...जयदेवने करून दाखवले हे... जखोबाच्या चेहऱ्यावरील चिंता अजून मिटली नव्हती. कारण मुख्य शत्रू सर्वक्रूर,घृणकर्मी असा अघोरीपंथीचा गोविंदपंत अजून हि त्या वाड्यात एका मोकाट सुटलेल्या राक्षसाप्रमाणे वावरत होता...तोच जयदेव जखोबाच्या नजरेस पडला... जयदेवा...! इकडे..मी इकडे आहे ...! जखोबाला समोर अगदी सहीसलामत पाहून जयदेवला धीर आला परंतु व्हऱ्हांड्यात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गडी गण्या त्याला पाहून दोघहि हादरून गेले... जयदेवराव...आता माया सुटलीय...साखळी तुटलीय....वाड्याचा दरवाजा आता काहीक्षणासाठी उघडेल तुम्ही लगेच बाहेर निघा...मी मागून येतो...निघा तुम्ही लगेच निघा.... असे म्हणत जखोबाने जयदेवला एकप्रकारे ढकलतच वाड्याच्या चौकटीच्या बाहेर ढकलून दिले... आणि स्वतःच वाड्याचा दरवाजा बंद करून घेतला...ढगांचा गडगडाट सुरूच होता आज संपूर्ण निसर्ग धरती वारा पाणी आसमंत अग्नी संपूर्ण पंचमहाभूत साक्षी ठरणार होते त्या न्राधामाशी होणार मनुष्याच द्वंद्व... आज आपल्या कुटुंबासाठी आपल्या प्रेमासाठी मैत्रीसाठी जो तो झुंजला...आता वेळ होती मनुष्याची सैतानाशी झुंज... अघोऱ्यांाीाी.....नराधमा. ..आज इथे फक्त तू आहे अन मी आहे....आज माझे प्राण गेले तरी बेहत्तर परंतु तुझा या त्रिशंकूमधून या मृत्यूलोकातून नायनाट केल्याशिवाय मी इथून जाणार नाही...लाव जोर तुझा....दाखव मलाही पाहूदे तुझी ताकत....दाखव... जखोबा वाड्याच्या व्हऱ्हांड्यात उभे गोविंदपंतास साक्षात ललकारत होता... समोर ये...असा...चांडाळा...

तोच व्हऱ्हांड्यात जखोबाच्या नजरेसमोर एक बलाढ्य शरीर उभ राहू लागल...त्याच हाडमांस बनू लागले त्वचेवर त्वचेचे आवरण चढू लागले शेवटी त्याचाच गोविंदपंताचा एक हुबेहूब आत्मा येऊन जखोबाच्या पुढ्यात उभा राहिला येताच क्षणी त्याने जखोबाची मान जसी चिमटीतच पकडली आणि एका झटक्यात त्याने जखोबाला उचलून दूर फेकून दिले...इकडे जयदेव वाड्याच्या बाहेर पडला त्याने विश्वास आणि संध्या दोघांचीहि शोधाशोध सुरु केली तेव्हा जयदेवने पाहिले एक भयानक काळ्याभोर धुराच्या वेटाळाच्या आतमधून एक पिशाच्च

## शब्दसाधना

बाहेर निघून आल आहे आणि कुठल्याहि क्षणी ते संध्याला धक्का देणार होत पावसाच्या जोराने वाऱ्याच्या झोतामुळे जयदेव आपल्या डोळ्यांवरती हात ठेऊन संध्याच्या दिशेने जाऊ लागला तिला बोलवण्याचा तिला हाक मारण्याचा प्रयत्न करू लागला इकडे गावातून येणाऱ्या जमावाच्या मशाली देखील आता मात देऊ लागल्या होत्या....विहिरीच्या तळाशी विश्वास ला संपूर्ण चारीही बाजूनी पिशाचानी अतृप्त प्रेतात्म्यांनी घेरून ठेवल होत...विश्वासचा श्वास आता अपुरा पडत होता त्याचे श्वास बंद व्हायला आले होते डोळ्यांवर भुरळ येऊ लागली होती आणि तसाच विश्वास तिथेच गाळामध्ये बेशुद्ध झाला कि तोच त्याचा हात बेशुद्ध अवस्थेत जाऊन थेट त्या गाठोड्यावरती पडला...त्या गाठोड्यावरती विश्वासचा हात पडला न पडला तोच जणू एक लक्ख प्रकाश त्या विहिरीमध्ये अवतरला विश्वासच्या शरीरावर ताबा मिळवण्यासाठी आलेले सर्व पिशाच्च तिथेच जागीच राख होऊन गेले त्याच क्षणी संध्याच्या मागावर आलेले पिशाच्च देखील हवेच्या एका झापाट्याने जणू पावसाच्या थेंबानी वाहून गेले....परंतु विश्वास विश्वास मात्र बेशुद्ध अवस्थेतच पाण्यात बुडत होता संध्या अनुला कांबरेवर घेऊन त्याला हाका मारत होती परंतु विश्वासला मात्र एक शब्दहि ऐकू जात नव्हता बघता बघता त्याच्या ह्रदयाचे ठोके कमी पडू लागले...कि तोच पाण्यात त्या विहिरीत एक मोठा आवाज झाला कोणीतरी काहीतरी मोठ त्या पाण्यात आल होत कोणीतरी त्या पाण्यामध्ये उडी घेतली होती पोहत पोहत विश्वासपर्यंत तो पोहोचला...आणि तो होता जयदेव...आपल्या मित्राची मदत करण्यास जयदेवने सेकंद हि लावला नव्हता त्या विहिरीत अंधपणे उडी घेण्याचा...जयदेवने विश्वासला खांद्यावर घेतले तेव्हाच त्याचवेळी विहिरीच्या गाळात अडकलेल ते गाठोडे विश्वासच्या हाताला अडकूनच बाहेर पडले तीच गोष्ट जयदेवच्या नजरेस पडली...जयदेवला कळून चुकले कि हेच ते देव्हाऱ्यातील देव जे त्या सैतानाच्या एका फटक्यात नाहीसे झाले होते...जयदेवने विश्वासला उचलून विहिरीतून बाहेर काढले बघता बघता तोपर्यंत संपूर्ण गाव तिथे येऊन पोहोचला होता प्रत्येकाच्या हाती जळत्या मशाली दिवे काठ्या अवजारे होती...कारण जखोबाने सरपंचांस वाड्याच धुळीत रुपांतर करण्याची मदत मागितली होती...संपूर्ण संतप्त गाव वाड्याबाहेर जमा झाला होता...जयदेवने विश्वासच्या पोटातील पाणी दाबून दाबून बाहेर काढले...इकडे जखोबाची अवस्था अगदी क्षीण झली होती अतिक्रोधाच्या भरात गोविंदपंताने जखोबावर आघात वर आघात करायला सुरुवात केली.... तू हरामखोर...अरे भाडखाऊ तेव्हा जर हि गोष्ट मला समजली असती....तर सावित्री संगे तुझा देखील मुडदा पाडला असता मी या वाड्यात....आता हि उशीर नाहीये झाला भोग...तुझ्या कर्माचे फळ... जखोबा आपल्या तोंडून एक शब्द देखील खूप मुश्किलीने काढू शकत होते...गोविंदपंताचा प्रत्येक आघार , हर एक प्रहार...जखोबाला मृत्यूच्या मुखाशी घेऊन जात होता.. गोविंदपंताने अवकाशाच्या दिशेने दोन्ही हात उंचावले....रे चांडाळकर्त्या तामसा...शक्ती दे मला.....मर्ल्ल्ल्ल्ल्ल..शक्ती दे... वाड्याच्या माथ्यावर ढगांनी वेडे वाकडे गोलाकार घ्यायला सुरुवात केली वाड्यातल्या प्रत्येक कान्याकोपऱ्यात दडलेली भयंकर भयंकर पिशाच्च आत्मे एक एक करून सर्व गोविंदपंताच्या उरात शिरले...त्याने जणू त्याची शक्ती अद्वितीय रीतीने वाढू लागली होती.

विश्वास तू ठीक आहेस न ? विश्वास ? संध्या आणि जयदेव दोघेही विश्वासला बेशुद्ध अव्स्थेतून जाग आली जड पापण्यांनी त्याने आपले डोळे उघडले... तसेच जयदेव आणि विश्वास दोघानाची हि नजर त्या गाठोड्यावरती गेली...जखोबाने आपले दोन्ही डोळे घट्ट मिटून घेतले... आज माझ्या सिद्धीची शक्ती या दानवास हरवू सकत नाहीएत....गोविंदपंताने संपूर्ण पिशाच्च योनीच काबीज करायला सुरुवात केली होती....गोविंदपंत अखेरीस जखोबावरती शेवटचा वार करणारच होता कि तोच....विश्वास आणि जयदेव दोघांनीहि त्या काळ्या गाठोडंची गाठ उकळून घेतली...कि त्याचक्षणी प्रभू श्रीरामांची एक मूर्ती त्या गाठोड्यातून बाहेर पडली... गोविंदपंतने बघता बघता सर्व वाड्यावर आपल प्रभूत्व मिळवलं होत देवाच्या उपस्थितीने सैतानाच्या बिनबुडाच्या पोकळ अश्या शरीरावर देवाच्या असण्याने फक्त असण्याने त्याची संपूर्ण शक्ती अगदी क्षीण झाली होती... जखोबा समजून गेले कि याची शक्ती आता देवाच्या शक्तीपुढे काहीही चालणार नाही तो आपला अखेरचा डाव वापरेल....आणि तसेच झाले गोविंदपंतांनी त्याच शरीराचा आधार घेत स्वतःचा आकार वाढवला एकेक्क करत सर्व प्रेत त्यांच्या भोवती उभे राहिले....जखोबानी मदतीस बंद केलेले आपले डोळे उघडले आणि आपल्या बाजूस पाहिले....तर तिथे

साक्षात संध्याची आई अर्थात....सावित्रीदेवी येऊन उपस्थित होती. तू हरलास ! राक्षसा ! तू हरलास ! पाहता पाहता वाड्याच्या अवतीभवती असंख्य काळे कावेल जमू लागले.... वाड्याच्या चारीहीबाजूनी तडतड तडतड करत चिरा जाऊ लागल्या....संध्याने ते पहिले आणि दरवाज्यात येऊन तिने आपल्या बाबाना बोलवण्यास सुरुवात केली परंतु जखोबाची जणू वेळच आली होती त्याने अखेरच्या नजरेने संध्याच्या दिशेने पाहिले संध्या विश्वास जयदेव तिघेही दरवाज्यातून आतमध्ये येऊन ठेपले होते....त्यांच्या डोळ्यासमोरच अघोऱ्याच भयंकर रूप राख राख होऊन जमिनीवर पडल होत अवकाशातून , नरकातून विजेची धार येऊन गोविंदपंताच्या आत्म्याचा खेच करत होती हा वाडा गोविंदपंताच्या शक्तीचा त्याच्या गुलामांच्या राहण्याचं दडण्याच,सर्वकाही त्यांच्या जिवंतपणी व्हायचं कदाचित आज याचा हिं अंत झाला होता... संध्या...? संध्या इथून बाहेर चल इथे थांबणे बरोबर नाहीये हा वाडा पडतोय याची एक न एक दिवस अशीच अवस्था होणार होती संध्या...? नको जाउस तिकडे ऐक माझ विश्वासने जबरदस्ती संध्याला ओढून बाहेर काढले....तोच संतप्त जमावाने आजपर्यंत घडलेली प्रत्येक चूक गोविंदपंतावर असलेला राग त्यांनी वाड्यावरती काढला... पाउस थांबला परंतु संध्याने आपला वडीलच जन्मदाताच गमावला होता संध्या विश्वासच्या खांद्यावरती डोक ठेऊन हुंदके देत देत रडत होती....आणि इकडे त्या सर्वांच्या नजरेसमोर गोविंदपंताच साम्राज्य धुळीस मिळत होते. कावळे कार्वीीी कार्वीीी... करू लागली... श्वापदे जणू स्वतंत्र मुक्तीमार्गानेच स्वच्छंद वावरू लागली...संपूर्ण वाडा जळून खाक झाला त्याची एक व एक वीट धुळीस मिळून गेली...त्याच्या दुसऱ्या दिवशी संध्या आणि विश्वास दोघांनीही सावित्री आणि जाखोबाच पिंडदान व श्राद्ध घातले.. अखेरीस गाव मुक्त झाला विश्वाराव.....गाव मुक्त झाला..तुम्ह्या कृपेने...

विश्वास संध्या व जयदेव तिघांनीहि त्या गावातली कटूच आठवणी मनात ठेवल्या होत्या परंतु संध्याचे वडील मिळण्याचा आनंद तिच्यासाठी वेगळाच होता पोरीसाठी त्यांनी आपला प्राण दिला होता. विश्वास संध्या जयदेव तिघेहि एका नवीन सूर्याच्या उगवतीच्या मार्गावर आपल्या घरी परतले आणि सुखाने नांदू लागले.....

## रात्रीला पंख फुटले

रात्रीला पंख फुटले
अन् ती गेली उडून
दिवस बिचारा काम करून
गेला थकून भागून
शोधू कुठं अन जाऊ कसं?
ही अर्धवट नोकरी सोडून
विचार करुनी वेडा झाला
मग्न गेला बुडून
वैनतेया सांगे विनवून
आणण्यास कामिनी शोधून
खगराज चहू भ्रमण करुनि
आला निरोप घेऊन
गरोदर आहे यामिनी
तात झालात म्हणून
गळून पार अर्धा झाला
जमीन गेली सरकून
कोण देईल सुट्टी मजला?
कोण करेल तिचे काम?
उडणारा बोजवारा आठवून
लावू लागला बाम
शिस्तीत नोकरी केली असती
तर नसते लागले माझे
नको तिकडे ध्यान दिले
आता उचला दोघांचेहि ओझे

**महेश मोहन माने,**
अंतिम वर्ष परमाणू व दूरसंचार अभियांत्रिकी

# जगतोय कशासाठी

प्रियांका गजकुमार पाटील
अंतिम वर्ष यांत्रिकी अभियांत्रिकी

वैचारिक लेख

ब्रम्हदेव म्हणजे मला एक उद्योजक वाटतात. ते अभियंते असावेत का ? असा देखील एक विचार मनाला शिवून जातोय

उद्योजक = ब्रम्हदेव = अभियंता

काहीतरी वेडेपणाचं वाटेल परंतु संदर्भ लागतील पुढे, काळजी नसावी. ब्रम्हदेव आणि अभियंता यांच्यात फार साम्य वाटतं मला. ब्रम्हदेव जे साक्षात या संपूर्ण सृष्टीचे पिता मानले जातात, आणि अभियंता जो एक तुच्छ मनुष्य आहे. (येथे अभियंते मंडळींचा अपमान करण्याचा कोणताही उद्देश्य नाही, तसे वाटल्यास क्षमस्व.) या दोघांची मी बरोबरी करतोय अथवा यांना एका पारड्यात ठेवतोय असं आजिबात नाही बरं का. तसा पोकळ गैरसमज नको.

ब्रम्हदेव आणि अभियंता या दोघांत मला साम्य या साठी वाटतं कारण सुंदर निर्मिती (इतरांच्या मते, मला थोडा प्रवाहाच्या उलट्या दिशेने विचार करायची सवय अंगवळणी पडली असावी कदाचित तेव्हां माझ्या मते नाही) करण्याची कला आणि ताकद या दोघांमध्येच आहे. ब्रम्हदेवांनी संपूर्ण सृष्टीची निर्मिती केली आणि अभियंता सुंदर आणि भव्य इमारतींची निर्मिती करतो. सृष्टी आणि इमारती सुंदर असं मानतो आपण परंतु या दोन्ही गोष्टी मातीत मिसळणार, नाशवंतच त्या.

चुकीचं असेल कदाचित परंतु असं ऐकिवात आहे. सतयुगातील लोकांचा जीवनकाळ म्हणे १० लक्ष वर्षांचा असायचा, अलीकडे त्रेतायुगात तो घटून १० हजार वर्षे झाला. द्वापारयुगात धरतीवर पाप वाढत गेलं आणि मनुष्याचा जीवनकाळ घटून १ हजार वर्षे झाला आणि आता कलीयुगात ते सरासरी १०० वर्षे आहे हे नक्की. ब्रम्हदेवांनी निर्माण केलेली सर्वात सुंदर निर्मिती मनुष्याने पाप करणं सोडलं नाही किंबहुना वाढवलं, धरतीला ते डोईजड झालं परिणामी मनुष्याचा जीवनकाळ घटत गेला. अभियंत्याचं पाहिलं तरी सारखंच, त्याने निर्माण केलेल्या इमारती सुद्धा (ताजमहाल, लाल किल्ला अशा अभूतपुर्व कलाकृती वगळता) १०० वर्षांच्या झाल्या की त्यांना धोकादायक इमारत घोषित करून त्यांना जमीनदोस्त करण्याचा घाट घातला जातो. मी थोडासा चुकीचा वाटेल परंतु लिहीताना मी केवळ माझ्या मनाचं ऐकतो.

खरं म्हणजे आज लिहिण्याचा उद्देश्य ब्रम्हदेव आणि अभियंते यांच्यातील साम्य सांगणे किंवा त्यांची तुलना करणे मुळीच नाही. जगतोयकशासाठीमनुष्य हा प्रश्न अचानक मनात घर करून गेला म्हणून हा लिहिण्याचा घाट.

ब्रम्हदेव मला एका उद्योजकाप्रमाणे सुद्धा भासतात. एक उद्योजक सतत त्याचा व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो, त्यासाठी तो सतत नवीन कामगारांची भरती करण्याला प्राधान्य देतो. चुका डोक्याच्या वर जायल्या लागल्या कि त्याला कठ कडे पाठवून त्याचा हिशोब करून बाहेरचा रस्ता दाखविला जातो. ईथे लक्षात घेण्यासारखं हे कि सततची मनुष्यबळ वाढविण्याची धडपड का तर ती व्यवसाय वाढविण्याची गरज. कामगाराला सततची संधी देणं कारण उद्योजक म्हणून तडकाफडकी निर्णय घेता येत नाहीत. पुढे चुकांचा डोंगर झाला कि कठ कडे हिशोब कारण केलेल्या कामांचा हिशोब होणं अत्यंत गरजेचं आणि शेवट बाहेरचा रस्ता कारण म्हणतात ना चुकीलामाफीनाही.

ब्रम्हदेवांचं वागणं सुद्धा तंतोतंत जुळतं बरं का. ईथे ब्रम्हदेव

हे उद्योजक. सुंदर सृष्टीची निर्मिती ही अखंड सुंदर रहावी म्हणून सतत ते मनुष्य प्राण्याची निर्मिती करतात. प्रत्येक वेळी त्यांना बहुदा आशा असावी, अपेक्षा असावी कि हा मानव जो मी निर्माण केलाय हा चांगला वागेल, आयुष्याचा अर्थ समजून घेईल, सृष्टीचं भलं करेल आणि कर्तव्यपूर्ती करून ताठ मानेनं येईल माझ्या पुढ्यात. हळुहळु त्यांचा विश्वास ढळत जात असावा, कारण ब्रम्हदेवांनी निर्माण केला म्हणून काय ?त्यांना अपेक्षा असल्या म्हणून काय ? मनुष्यच शेवटी तो. तुच्छ, बेशरम, पापी, अवगुणांचा पुतळा. परंतु बाप हा स्वतःच्या संतानाला बेमाप संधी देतो, तसेच ब्रम्हदेव करीत असावेत. नशीब थोर या कलीयुगातील मनुष्याचं म्हणून सरासरी १०० वर्षे तरी संधी मिळतेच त्याला. (गुणाने जगला तरच हे विसरायला नको). पुढे राहतात दोन टप्पे. परंतु ईथे ब्रम्हदेव थोडे निराळे भासतात. ते आधी बाहेरचा रस्ता (मृत्यु) दाखवतात आणि मग होतो अंतिम हिशोब. हिशोब होतो पाप पुण्याचा कठ (यम आणि चित्रगुप्त) च्या दरबारात.

अरेच्चा ब्रम्हदेव, अभियंते आणि उद्योजक मंडळींनी पुरता गुंतवुन ठेवलं मला आणि तो प्रश्न पिछाडीवर पडला जगतोय्कशासाठी ? मला खात्री आहे अडाणी तर सोडाच परंती सुशिक्षित माणसाला सुद्धा या प्रश्नाचं सुटसुटीत आणि पटेल असं, साजेल असं उत्तर देता येणार नाही. अमाप पैसे मिळवणे, गडगंज संपत्तीचा साठा करणे, त्याच्यापेक्षा मला जास्त कसं मिळेल याचा अट्टाहास करणे हे सगळं निमित्तं झालं. पैसेच नसते अस्तित्वात तर ? करूयात एकदा विचार, पैसेच नसते तर ? काय असता कलियुगातील माणसांच्या जगण्याचा शेवटचा उद्देश्य ? (तूर्तास पैसे अस्तित्वात आहेत म्हणून शेवटचा उद्देश्य बहुदा तोच आहे कित्येकांचा) खरं तर हा विचार करण्याची कल्पनाच भन्नाट आहे, भयावह आहे. पाण्याच्या ग्लासात मुंग्या कालवून प्यावं अशी अवस्था होईल परंतु योग्य उत्तर मिळणार नाही. असो, सोडून द्या विचार.

नित्यक्रमाचं आयुष्य जगण्याची सवय झाली आहे आपल्याला. जन्माला यायचं, पालथं पडायला, रांगायला, बसायला, चालायला, बोलायला शिकायचं. इथ वर ठीक होते परंतु पुढे सुरवात होते एका प्रतियोगितेला, मग ती चालूच राहते अगदी मरेपर्यंत. प्रतियोगिता सतत पुढे पळायची, प्रतियोगिता चढाओढ करायची आणि प्रतियोगिता खेकड्याच्या प्रवृत्तीची (एकमेकांचा पाय ओढणे) विद्यालय, महाविद्यालय ? पुढे जायचयं. मोठी पदवी घ्यायचीये ? चढाओढ करायची. नोकरी पाहिजे ? पळ पळ जोरात पळ, कंपण्यांच्या वार्या कर. मिळाली नोकरी. आता पुढे काय ? तर मोठी पदं हवीत, मग बन खेकडा, ओढ पाय. पुढे काय ? लग्न, मग चालू होतो महत्वाचा कार्यक्रम. माझी बायको, माझा पोरगा, माझा संसार, माझं घर, माझा प्रपंच, माझा ढिमका, माझा फलाना. शेवट काय तर पळ पळ पळाला मग मेला, खाक झाला, धुळीला मिळाला. अवगुणांचा जिताजागता पुतळा, तुच्छ मनुष्य प्रचंड धावपळ करून नेस्तनाबूत झाला. आजन्म माझं हे, माझं ते करीत राहतो मनुष्य मग हा देश कोणाचा, माती कोणाची, हा समाज कोणाचा हा विचार का करत नाही मनुष्य ? स्पष्ट उत्तर आहे याचं, स्वार्थी आहे मनुष्य प्राणी.

ब्रम्हदेवांनी ना एक गफलत केली असावी. माणसाला बुद्धी दिली, त्याला काय सुचलं आणि या माणसाने केला पैसा निर्माण. बरं त्याच्यामागे धावत राहिला आणि जाणते अजाणतेपणी असंख्य पापं करीत राहिला. चांगलं वागायचं नाही, आयुष्याचा अर्थ समजून घ्यायचा नाही, या निसर्गावर प्रेम करायचं नाही. मानवधर्माची कर्तव्यपूर्ती न करता गुणधर्माप्रमाणे नालायकासारखं मृत्युला अलिंगण द्यायचं, म्हणजे काय तर सृष्टीच्या निर्मात्याच्या सर्व अपेक्षांना तडा देतो हा तुच्छ मनुष्य.

माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि मग माझ्या तळ्याचं पाणी पी. तसे न केल्यास तुझ्या भावांप्रमाणे तू सुद्धा मरण पावशील, अशी अट धर्मराजाने युधिष्ठिराला घातल्याची गोष्ट ऐकिवात असावी सर्वांच्या. माणसाला सुद्धा आयुष्याच्या शेवटी अशीच काहीशी अट घातली जावी. ती अट जगण्यासाठी होती, माणसाला अट घालावी ती मरण कष्टदायक नसावं म्हणून. आणि प्रश्न एकच असावा.

आयुष्याची एवढी वर्षे तू या धरतीवर व्यतीत केलीस, तिच्या र्हासाचं कारण बनलास. परंतु तू तुझ्या संपूर्ण आयुष्यात या भूमीसाठी म्हणून काय केलस ?????

# पारंपारिक खेळ

शुभम शिरोळे
द्वितीय वर्ष यांत्रिकी अभियांत्रिकी

**माहितीपर लेख**

सूर पारंब्या, आट्या-पाट्या, गोट्या, सागरगोट्या, लगोरी, मंगळागौरीचे खेळ, झब्बू, बदाम सात, कबड्डी, खो-खो, विटी-दांडू, गलोल, भातुकली - एक एक आठवायला बसलं की असे कितीतरी खेळ आठवतात. काही खेळ साधे, रंजन करणारे, तर काही स्पर्धात्मक , चढा-ओढीचे, जिंकण्याची ईर्षा निर्माण करणारे. या प्रत्येक खेळाबरोबर महाराष्ट्राचा, मराठी माणसाच्या संस्कृतीचा एक धागा जोडलेला आहे. हे खेळ जिथे खेळले जायचे तिथल्या समाजाचा, परिसराचा इतिहास त्या त्या खेळात आपण पाहू शकतो.

हे खेळ त्या त्या गावच्या संस्कृतीचे आणि तिथल्या रूढी-परंपरांचे प्रतिकं आहेत. सूर पारंब्या जिथे वडाची झाडे होती तिथे खेळला जात होता, गोट्या तर मुले घरोघरी खेळत होती. अख्ख्या महाराष्ट्रात मंगळागौरीचे खेळ बायका श्रावण महिन्यात खेळत असत. पूर्वीच्या काळी जेव्हा बायकांना घरातून बाहेर पडण्याची परवानगी नसे तेव्हा हे खेळ खेळणं बायकांनी एकत्र येण्यामागचं निमित्त होतं. अख्खी रात्र खेळ खेळण्यात जागवली जायची. काही खेळ तर प्राण्यांशी संबधित आहेत. जसे सांगली जिल्ह्यातील समडोली गावात कबूतर पालन हा एक पारंपारिक खेळ आहे. भातुकलीचा खेळ तर प्रत्येक लहान मुलांना येणार्या प्रौढ वयातल्या जबाबदार्यांची तयारीच करून घेत असे१. असे अनेक खेळ महाराष्ट्रातल्या छोट्या छोट्या गावात प्रचलित असतील पण आपल्याला त्याबद्दल काहीच माहिती नाही.

आज हे सर्व खेळ आपण विसरलो आहोत. अशा प्रकारचे अगदी महाराष्ट्रातल्या भूमीतले काही खेळ होते हे आज सांगितले तर अनेकांना आश्चर्यच वाटेल. हे खेळ नेमके कुठले, पहिल्यांदा कधी खेळले गेले? आज कुठे खेळले जातात का? आपल्याकडे आज या प्रश्नांची उत्तरे नाहीत. महाराष्ट्राच्या या क्रिडा संस्कृतीचे वर्णन कुठेही लिहीलेले नाही. हा इतिहास कोणाला अवगत आहे का हे ही सांगता येणार नाही.

आपली जीवनसरणी बदलली आणि आपण हे खेळ खेळायचे थांबलो. फारसे काही साहित्य न लागणार्या अशा या खेळांमधून उत्तम व्यायाम तर होतोच पण आपल्यातले उपजत कला-कौशल्य पणाला लागते. सध्याच्या मोबाइल आणि कॉम्प्युटर मगेम्सफ च्या युगात लोकांनी एकत्र येऊन खेळायला अनन्यसाधारण महत्व आहे.तंत्रज्ञानाच्या प्रगतीची दुसरी बाजू ही की लोकांमधील तुटत चालेला संवाद या खेळांमुळे रोजच्या कामांमधून वेळ काढून लोक एकत्र येतात, खेळतात, करमणूक होते, संवाद वाढतो आणि मन प्रसन्न राहते. आपल्या संस्कृतीची आठवण म्हणून आपण येत्या पिढीला हे खेळ शिकवायला हवे.

आज जगभर पारंपारिक आणि स्थानिक खेळ पर्यटनाचे एक आकर्षण असताना महाराष्ट्रात मात्र आपण त्याचा ह्या दृष्टीने विचार केलेला नाही. आपल्या खेळांमुळे जगभरातले पर्यटक आकर्षित होऊ शकतात; ही संधी आपण घेतली पाहिजे.

आपल्याला आपल्या मराठी संस्कृतीचा अभिमान आहे, हे नक्की. पण हा अभिमान नक्की कशा कशा मुळे आहे याचा आपल्याला विसर पडतो. आपल्या संस्कृतीचे घटक कोणते, ती कशामुळे एवढी समृद्ध झाली हे आपण जाणून घ्यायला हवे. महाराष्ट्राची क्रीडासंस्कृती सुद्धा समृद्ध आहे, हे या निमित्ताने आपण समजून घेऊ शकतो.

आपल्याकडे एकूणच खेळाला दुय्यम स्थान दिले गेलेले दिसते. क्रीडा आणि खेळाकडे आपण गांभीर्याने बघत नाही. पारंपारिक क्रीडाप्रकारांना दुय्यम स्थान दिले जाते आणि मोठ्या शहरात तर क्रिकेट, टेनिस, फुटबॉल या सारखे प्रचलित खेळच फक्त माहित असतात. पारंपारिक खेळ काही छोट्या गावांपुरतेच सीमित राहिले आहेत. ह्या खेळांचे महत्त्व लक्षात न घेतल्यामुळे त्यांच्याबद्दल माहिती उपलब्ध नाही आणि त्यांचा प्रचार त्या त्या गावांबाहेर झालेला नाही.

मराठी संस्कृती ही अनेक क्रीडाप्रकारांचे माहेरघर आहे. असे खेळ महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात आहेत. राज्य सरकारच्या पर्यटन खात्याच्या अंतर्गत एक गट स्थापन करायला हवा जो या सर्व खेळांची माहिती गोळा करून मपारंपारिक खेळ आणि क्रीडा कोषफ तयार करेल.

महाराष्ट्र सरकारचं पारंपारिक खेळ आणि क्रीडा याचे एक स्वतंत्र संकेतस्थळ असायला हवे. हे संकेतस्थळ स्वयंस्फूर्त निधीतून (crowd-funding / voluntary financing) उभे केले जाइल. या संकेतस्थळावर हा कोष उपलब्ध होऊ शकेल. गावागावातील पारंपारिक खेळ संघ या संकेतस्थळावर आपला खेळ / क्रीडा प्रकार नोंदवू शकतील. या गावांना पारंपारिक खेळ क्षेत्र म्हणून सरकार मान्यता मिळायला हवी. जिल्हा पातळी वरून हे काम केले जाईल पण सर्व जिल्ह्यांचा समन्वय राज्य पातळीवरून व्हायला हवा.

जे खेळ अजूनही खेळले जातात त्या त्या ठिकाणाला त्या खेळाचे मपारंपारिक खेळ पर्यटन क्षेत्रफ म्हणून जाहीर करायला हवं. ज्या गावांमध्ये आता फारसे खेळणारे उरले नाहीत, तिथे गावकर्यांनी ठरवल्यास या खेळांचे पुनरुज्जीवनही करता येईल.

या पारंपारिक खेळ-क्रीडा पर्यटन क्षेत्राला खालीलप्रमाणे काही विशिष्ठ मानदंड असावेत:

किमान एक पारंपारिक खेळ / क्रीडा प्रकार स्थानिक गावातील असावा.

स्थानिकांना हा खेळ येणं आवश्यक असेल.

खेळ / क्रीडा प्रकार शिकवता येऊ शकेल असे प्रशिक्षक असावेत.

पर्यटकांसमोर प्रात्यक्षिक / प्रशिक्षण देता येऊ शकेल असा स्थानिक गट असावा.

शिकणारे खेळाच्या कौशल्याची एकेक पायरी चढत सर्वोत्कृष्ट पातळी गाठू शकतील असे प्रशिक्षक असावेत

प्रत्येक जिल्हा अशा प्रकारच्या पर्यटनाला संधी मिळावी म्हणून एका खेळासाठीचे विशेष केंद्र असू शकेल. जे गाव या खेळाचे पारंपारिक स्थान असेल तिथे या खेळाची माहिती आणि प्रशिक्षण दिले जाईल, तिथेच या खेळावर संशोधन केले जाईल. या खेळांची प्रात्याक्षिके पर्यटनाच्या हंगामात दाखवली जातील. या खेळाविषयी उत्कृष्ट माहितीपट, चित्रपट, ग्रंथ, पुस्तके ह्याचे एक ग्रंथालय तिथे विकसित करता येईल. या केंद्राया केंद्राला पर्यटकांना आकर्षित करायला विशेष सहाय्य उपलब्ध करता येऊ शकेल. यटकांसाठी या खेळाची प्रात्यक्षिके आयोजित करता येऊ शकतील, तसेच उत्सुक पर्यटकांना तो खेळ शिकण्याची सोयही असेल. या गावातील हे केंद्र इतर जिल्ह्यात आपापल्या पारंपारिक खेळाचा प्रचार करेल. इतर जिल्ह्यातील मुले-मुली हे पारंपारिक खेळ शिकायला या केंद्रावर येऊ शकतील.

काही खेळ जे आता फारसे प्रचलित नाहीत त्यांना अशा पद्धतीने पुनरुज्जीवन करता येऊ शकेल.

हे खेळ आपापल्या गावी खेळले जातात तसे इतर ठिकाणीही जायला हवेत. महाराष्ट्रातल्य इतर जिल्ह्यात, इतर राज्यांमध्ये आणि परदेशात सुद्धा या खेळांबद्दल कुतूहल जागृत व्हायला हवे, त्यांची माहिती मिळायला हवी.

काही बैठे खेळ, उदाहरणार्थ सागरगोटे, लगोरी, गोट्या हे सद्धा तितकेच महत्वाचे. या बैठ्या खेळांचे नाशिक जिल्ह्यात एक केंद्र स्थापन करून तिथे हे खेळ शिकवायचे आणि प्रचलित करायचे सुरु व्हावे असे वाटते. प्राथमिक शाळांमधून हे बैठे खेळ शिकवले जावेत. राज्य सरकारच्या पर्यटन खात्याच्या अंतर्गत एक गट स्थापन केला जावा जो प्राथमिक शाळेच्या पातळीवर पारंपारिक क्रीडा प्रकार आणि खेळ शिकवण्यासाठी समन्वय साधेल.

# पावसाळ्यातील एक दिवस

शुभम शिवाजी पाटील
अंतिम वर्ष यांत्रिकी अभियांत्रिकी

एकांकीका

सकाळचे १० तरी वाजले असतील पण आभाळांत ढगांनी झिम्मा घातला होता त्यामुळे सूर्यदेव नक्की कुठे आहे हे सुरेशला सांगणे अवघड जात होते. गांवातील बाजार मध्ये सुरेश चहा साठी थांबला. गाडी त्याने शंकराच्या मंदिराच्या बाजूला पार्क केली आणि छत्री घेऊन पळत पळत तो दुकानाकडे आला. डोंगरी गांवचा बाजार म्हणजे मोजून सहा दुकाने. महादू शिंपी, गोरा न्हावी जो प्रत्यक्षांत काळा होता, साखरंचि चहा आणि हलव्याची टपरी, बाजूला रामभाऊ आपले भूसारीचे दुकान चालवीत. बाकीची दोन दुकाने नक्की काय विकत होती हा सुरेशला सुद्धा प्रश्न होता.

पाव्हणं नवीन दिसतंय गावांत सखाराम ने प्रश्न न करता सुरेशच्या हातात चहा चा ग्लास दिला. सुरेशने मान हलवून तो ओठाला लावला. पावसाच्या धारांनी चाहोबाजूला पाणी वाहत होते. जणू काही छोट्या छोट्या नदिनी रस्त्यावर आक्रमण केले होते. बाहेर पाऊस पडताना गरम गरम चहा पिणे हा एक वेगळाच आनंद सुरेशला नेहमी पासून वाटत आला होता पण पाऊस आणि सुरेश ह्यांचे अजिबात पटत नव्हते. पाऊस ह्या प्रकारचा त्याला इतका तिटकारा होता कि तो आनंदाने पुण्यात स्थायिक झाला होता.

सखारामच्या टपरीवर गजानन मास्तर चहा पीत बसले होते. तुमच्या तिकडे असा पाऊस पडत नाहीत वाटत पाव्हणं त्यांनी सुरेशला विचारले. एके काली पडत असे, आता नाही पडत त्याने उत्तर दिले.

हो हल्ली पर्यावरणावर मानवाने इतका हल्ला चढवला आहे कि सगळंच हवामान बदलत आहे राव सखारामने गरम गरम शिरा आणून ठेवत म्हटले.

सगळ्याच गोष्टी बदलत आहेत. माणूस सुद्धा. सुरेशने खिशांतून १०० ची न सखाराम ला देत म्हटले.

खरे आहे, पण आमच्या गावांत नाही बर का लोक बदलत. आमचा गाव मात्र तसाच सुन्दर आहे. लोक सुद्धा साधी भोळी, आपली थोडक्यांत सुख मानून राहणारी. एक मेकांना मदत करणारी. आमचा डोंगरी गांव आहेच एक्दम सुबक.

हो पाऊस पडतोय म्हणून कदाचित मी पूर्णपणे पाही नाही शकलो सुरेशने भावनांवर ताबा ठेवत म्हटले.

तुम्हाला नाही का पावस आवडत ? गजानन मास्तरांनी म्हटले. पुढे तेच बोलू लागले पाऊस म्हणजे नवीन जीवन. हवामानाच्या त्या किचकट प्रक्रियेतून ते पाणी लक्षांत जाते काय आणि पुन्हा खाली येते काय पण त्यातूनच आमचे पीक उभे राहते. शेतकरी पावसाची अशी वाट पाहतो जशी त्या लैलेने मजनूची वाट पहिली नसेल. असे म्हणून तेच खो खो हसले. सखारामच्या चेहऱ्यावर सुद्धा स्मित आले.

पण त्या मजनूची झाली तशीच अवस्था आमच्या बिचार्या शेतकऱ्याची होती हो, कारण परवाच वाचनात आले कि शेतकऱ्याची जमीन सरकार हिसकावून घेतेय म्हणून सुरेशने मास्तरांना विचारले.

वाह, आमच्या गावाचे नाव पेपरात आले काय ? मास्तरांनी आनंदात विचारले. हो त्या कसल्या तरी प्लांट साठी आमच्या गावांतील शेतजमीन एक मोठी कंपनी विकत घ्यायला पहाटे पण आम्ही नाही देणार. असले प्लांट बाळंत नको आम्हाला आमच्या गावांत. आमच्या शेतीमालाला सरकारने भाव द्यावा आणि आम्ही जगू

तुमची शेती आहे का हो ? सुरेशने त्यांना विचारले.

नाही बुवा, आमची कुठे शेती ? आम्ही शाळेंत मास्तर आहोत. आम्हाला सरकार पगार देते. मास्तरांनी सांगितले.

चहाचा काप ठेवून सुरेश उठला आणि त्यांनी सखाराम आणि मास्तरांना राम राम केला. गाडीत जाऊन त्याने गाडी सुरु केली आणि त्या वायपरच्या आवाजांत तो पुन्हा गाडी घेऊन गावतील त्या एका रस्त्याने आंत गेला.

एक प्रशस्त घरापुढे त्याची गाडी थांबली. गांवातील इतर सर्व गरीब घरापुढे हे घर मात्र मोठे श्रीमंत वाटत होते. सुरेशला पाहताच दार उघडणाऱ्या मुलाने घरांत धूम ठोकली. थोड्या वेळाने भले मोठे पोट सांभाळीत धोतर घातलेली एक मोठी व्यक्ती हजर झाली.

या या सुरेशराव, तुमचीच वाट पाहत होतो त्यांनी सुरेशला आलिंगन दिले. पावसाची धार बाहेर थोडी कमी झाली होती. दर उघडलेला मुलगा आता बाहेर एका डबक्यांत कागदी होडी सोडत होता.

अग, हा सुरेश. ते गोपाळभट नव्हते का? जे कधी कधी श्राद्धाला वगैरे इथे यायचे ? त्यांचा मुलगा हा लहान असतानाच पुण्याला गेला होता शिकायला तात्यारावांनी आपल्या बायकोला सुरेशची ओळख करून दिली.

सुरेश खुर्चीत बसला.

हा पाऊस अगदीच अवदसा आहे बघ. नक्की आजच पडला हरामखोर तात्यारावांनी पावसाळा शिवी हासडली. सुरेशला मानतो थोडे बरे वाटले.

तर सुरेश, तू चांगला शिकलेला माणूस. गोपाळभटानी तुला पुण्यात पाठवले ते अगदी बरे केले बघ. इकडे गावांत काय आहे ? तुझ्या बरोबरचे सर्व मुलगे शिकायला म्हणून बाहेर पडले आणि कुणी पुन्हा परत नाही आला. का येणार ? इथे ना धड शाळा आहे ना हॉस्पिटल. इथे राहिलेत ते फक्त उनाड टोणगे. ह्यांना शेतांत काम करायला नको पण बुलेट घेऊन फिरायला पाहिजे. मग आमच्यासारखी माणसे ह्यांचा फायदा घेणार नाहीत तर काय ? असे म्हणून चेहऱ्यावर एक प्रकारची निर्लज्जता दाखवत तात्याराव हसले.

मी सचिनला शिकायला थेट ऑस्ट्रेलियात पाठवले. मग आता तो म्हणतो तिथे घर घ्यायला किती मिलियन कि फिलियन पाहिजे. मग काय कर करणार ? इथे उसाच्या शेतीतून धड पन्नास हजार काढायला दमछाक होते. काही फोन केले तर म्हणे मुख्यमंत्र्यांचे जावई बियर फॅक्टरी घालू इच्छित आहेत. मीच आधी आमच्या गावाचे नाव घेतले आणि नंतर इथल्या टोणग्यांना हातात धरून विरोध सुद्धा केला. जमिनीचा भाव आहे १८० रुपये. मी आवई उठवली कि सरकार ५ रुपयांत जमीन हिसकावून घेत आहे. लोक जाम घाबरलेत. मुख्यमंत्र्यांशी मी आधीच बोलून ठेवलेय. शेवटी भाव मिळेल ८०० रुपये पण त्याआधी २० एकर जमीन त्यांच्या मुलीच्या नावाने पाहिजे. आता मी हींत तिथं हात मारून अनेक लोकांची जमीन २०० रुपये कुठे १५० रुपये देऊन मिळवली पण फक्त ३० एकर जमीन मिळालीय. ह्यातील २० एकर घेणार मुख्यमंत्र्यांची पोरगी आणि लोकल आमदार. बाकी दहा मला. आणखीन २० एकर जमीन फॅक्टरी साठी पाहिजे. एकदा हि २० एकर मिळाली कि सरकारदरबारी हमीभाव मी ८०० रुपयांनी मिळवीन आणि रातोरात पैसे करून मोकळा होईन. गोपाळ भटांची १० एकर जमीन आहे हे मला समजले. इतका प्रयत्न करून तुला शोधले. गोपाळभटांना धोका देणे शक्य नाही. ब्राह्मणाला धोका देऊन मी कुठे नरकात जाणार ? नाहीतरी जमीन तुला उपयोगाची नाहीच आहे.

सुरेश इतका वेळ शांतपणे ऐकत होता. तात्यारावांच्या बायकोने चहा आणून ठेवला होता. सचिनचा ऑस्ट्रेलिया मधील फोटो भिंतीवर साईबाबा च्या बाजूला झळकत होता.

बरोबर आहे. मी काय करणार जमीन घेऊन? गावं आल्यालाला १० वर्षं झाली. बाबा सुद्धा पुण्यातच वारले. सुदैवाने त्यांना हृदयविकाराचा झटका आला तेंव्हा ते पुण्यात होते. मी ताबडतोब हॉस्पिटल मध्ये नेले त्यानंतर त्यांना गावी जायलाच बंदी केली. हाच झटका इथे आला असता तर ते हकनाक गेले असते.

एक्दम खरं बोललास बग. सचिन म्हणतो मी का नाही पुण्या मुंबईत जात. पण आम्ही इथंच मरू. आमहाला नाही बा पुण्याला जायचं असे म्हणून तात्याराव पुन्हा मोठ्याने हसले.

तर तुझ्या दहा एकराच्या जमिनीला मी बाजारभावापेक्षा जास्त म्हणजे २५० रुपये देतो. म्हणजे सुमारे ११ लाख रुपये

होतात. जमीन शेतजमीन आहे आणि आमच्या थोर सरकारने बळी राजाचे रक्षण करण्यासाठी जमीन बदलावर बंदी घातली आहे. त्यामुळे तू कितीही धडपड केलीस तरी जमीन १८० रुपयांपेक्षा जास्त मध्ये जाणार नाहीच त्याच वेळी जमीन तू फक्त शेतकऱ्यालाच विकू शकतोस. आता आमच्या रक्त देशांत ११ लाख मोजून जमीन घेणारे शेतकरी आहेतच किती ?

आता मी एकदा जमीन घेतली आणि मुख्य मंत्र्यांना त्यांची बॅग पोचली कि ते एक फोन करतील आणि रातोरात शेतजमीन कमर्शिअल मध्ये बदलेल. मग त्याची दर अव्वाच्या सव्वा होते. मान्य असेल टर्म इ पेपर्स रेडी ठेवले आहेत फक्त सही द्यायची बाकी मी पाहतो.

सुरेशने मान हलवली.

तात्यारावांनी आंत जाऊन पेपर्स आणले. सुरेशने वाचीन सही मारली. तात्यारावांनी चेक लिहून दिला.

चेक खिशांत ठेवून सुरेश गाडी सुरु करून बाहेर आला.

गाडी सुरु करणार इतक्यांत गजानन मास्तर चालत येताना दिसले. अहो पाव्हणं, तुम्ही इथं का ? कसा वाटला आमचा गांव ? लोकं इथली अतिशय सभ्य बर का तुमच्या शहराप्रमाणे नाही. आणि तात्याराव तर गावांत देवा सारखे. गावांत तो प्लांट जो जमीन बाळगायला पाहतोय ना त्याच्या विरोधांत त्यांनीच तर शड्डू ठोकलाय त्यांनी माहिती दिली. सुरेश ने हसून मान हलवली.

पावूस कमी झाला होता आणि सुरेश च्या मनातील चलबिचल सुद्धा कमी झाली होती. पाऊस सुरेशला अश्यासाठी आवडत नव्हता कि जेंव्हा जेंव्हा पाऊस पडतो तेंव्हा तेंव्हा सगळीकडे बदल होतो. मुले शाळा बदलतात, क्लास बदलतात, काही मुले पावसाच्या सुरवातीच्या दिवसांत शाळेतून कॉलेज मध्ये जातात, नवीन मित्र बनवतात तर आजूबाजूला जमीन सुद्धा रंग बदलते. हा बदल सुरेशला नेहमीच अस्वस्थ करत आलाय आणि त्यामुळे पाऊस पडला कि सुरेश अस्वस्थ होतो.

डोंगरी गावांतून बाहेर पडताना सुरेशला वाटले कि पाऊस पाहून किंवा फुलणारी एक कळी पाहून त्यांत रोमँटिक होणे माणसाला आवडते पण त्यातील सत्य पाहण्याची शक्ती मात्र फार कमी लोकांकडे असते. गांवातील लोक साधे भोळे आणि शहरातील लोक ठग असे वाटले तरी आपल्याच लोकांच्या पाठीत सूर भोकसणारे तात्याराव सगळीकडेच असतात. शेतजमिनीला विनाकारण चिकटवून सरकार आमचे रक्षण करील अशी आशा बाळगणारे गुलाम ब्रिटिश काळांत हतोय आणि स्वतंत्र भारतात सुद्धा आहेत. भकास होणारा गांव सुद्धा काही लोकांना सुंदर वाटतो. आणि नवीन रोजगार घेऊन येणारा प्रकल्प त्यांना वाईट वाटतो.

पाऊस सुदैवाने मानवी स्वभावासारखा नाही. बिचारा नेमेचि येतो (कधी कधी ) आणि आपले काम करून जातो.

## लहानपणी असें वाटे

लहानपणी असें वाटे, कधी कधी मोठे होते! सायकल ने शाळेत जाईन, खुप मनात होतें,
नंतर त्याचा येऊ लागला कंटाळा,वाटलं कॉलेज बरा!
वर्ग मोठे होत गेले, अभ्यासाचा कित्ती वाढला पसारा!
मन फुलपाखरू होऊ लागले होतें, मन कुठं कुठं भटकंती करू लागले होते,
एका ठिकाणी राहील तर ते मन कस?
बाहेरून टोमणे येतं, चूप वाटेल का बसावस!
आत्मनिर्भर होईल, असा विश्वास खुप,
नवीन जगाचे बघितले रोज बदलते रूप,
खूप खाल्ल्या खस्ता, झाले पायावर उभी,
मोठेपणा आला तसा कित्ती सुटल्यात बाबीं !
सुरू झाली घोडदौड, करीयर साठी येथे,
फुरसत नव्हती थांबायला क्षणभर इथे!
स्पर्धा होत्या खूप होती बरीच आव्हाने,
कमान आयुष्याची उंचावत होती सातत्याने,
बघितलं मागे वळून, लहानपण दूर होतं बसून,
बोलावत होत मला ते रोज खुणावून,
वाटलं नको नको ते मोठं होणं, लहानच बरं!
आयुष्याची खरी मज्जा याच काळात हेच खरं!!

**मानसी प्रकाश कुंभार**
तृतीय वर्ष, संगणक अभियांत्रिकी

# भाषा आणि समाज

**शुभम माळी**

अंतिम वर्ष यांत्रिकी अभियांत्रिकी

**वैचारिक लेख**

मराठी माणसाचा, मराठी भाषेसाठी आणि संपन्न मराठी संस्कृती असलेला स्वाभिमानी, सुसंस्कृत, सक्षम महाराष्ट्र

भाषेवर समाज उभा रहातो, मोठा होतो असा जगाचा अनुभव आहे. जगाला हेवा वाटावा असा महाराष्ट्र घडवण्याचं स्वप्नं आमच्या उराशी आहे. तसा तो घडवायचा तर भाषेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नाहीतर विकास व्हायचा पण आम्ही स्वत: लाच, स्वत:च्या इतिहासालाच विसरायचो. मराठी समृद्ध करून सध्याच्या जागतिकीकरणात, आधुनिकीकरणात तिला ज्ञानभाषा करण्याचं, तिला जागतिक व्यापार-उदीमाची भाषा करण्याचं आमचं स्वप्न आहे. ते का करायचं, कसं करायचं ह्याची ही समग्र योजना. भाषेबरोबरच मराठी संस्कृती आणि मराठी समाज कसा असावा, कसा असेल ह्याचंही चित्रं ह्या विभागात मांडत आहोत. म्हणूनच म्हणतो आहोत - असा असेल आमच्या स्वप्नातला उद्याचा महाराष्ट्र.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापनाच मराठी माणूस, मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीच्या रक्षणासाठी, त्याच्या न्याय्य हक्कासाठी आणि त्याला उज्वल वैभव प्राप्त करून देण्यासाठी झाली. अगदी पहिल्यापासूनच ह्यासाठी पक्षानं आंदोलनं केली, लढे दिले आणि पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांनी त्यासाठी केसेस अंगावर घेतल्या.

ह्या मराठीपणाचे संरक्षण, जतन आणि त्याची प्रगती करणं हा पक्षाचा ध्यास आहे. मराठी माणसाचे गोमटे करणे हा पक्षाच्या विचारांचा आत्मा आहे.

माणूस म्हणजे भाषा - भाषा आहे म्हणून माणूस आहे

माणसाला भाषाच नसती तर काय झालं असतं? प्राणी आणि माणूस ह्यात काय फरक असता? प्राण्यापासून माणूस वेगळा आहे कारण माणसाकडे भाषा आहे. माणसाला भाषा सापडली आणि त्याची प्रगती सुरु झाली. आपल्या भाषेतून माणूस जग बघायला लागला. आपण काय शिकलो ते जगाला सांगायला लागला. जगाकडून आपल्या भाषेतच शिकू लागला. लहान मूल बघा. आईचे शब्द त्याच्या कानावर पडतात आणि त्याची जगाची ओळख सुरू होते. त्यामुळे एखाद्या मुलाचा जन्म जसा त्याच्या घरात होतो, कुटुंबात होतो तसाच त्या मुलाचा जन्म त्याच्या भाषेत होतो. मुलाचा जन्म कुठे झाला असं आपण म्हटल्यावर आपण त्याच्या गावाचं नाव सांगतो किंवा त्याच्या घराचं नाव सांगतो. ते खरंच आहे पण तसंच हेही खरं आहे की त्या मुलाचा जन्म एका भाषेत होतो.

ह्या संदर्भात ई. एम. सियोरान नावाच्या विचारवंताचं वाक्य खूप छान आहे, त्यानी म्हटलं आहे - One does not inhabit a country; one inhabits a language. म्हणजे, माणूस कुठल्या देशाचा नसतो, तर तो एका भाषेचा असतो.

म्हणूनच माणूस म्हणजे त्याची भाषा. मराठी माणूस म्हणजे मराठी भाषा.

म्हणूनच भाषेच्या मुद्दयावर जगात लढाया झाल्या, देश निर्माण झाले. देश तुटले. आपल्या देशात भाषेवरच राज्यं निर्माण झाली. पाकिस्तान आणि बांगला देशाचं उदाहरण घ्या. धर्म एक, पण भाषा वेगळी. फार काळ हा फरक टिकू शकला नाही. नवा देश निर्माण करावा लागला. युरोपमधले देश घ्या. त्यांचा भूगोल सारखा आहे. व्यापारातलं चलन एक आहे पण देश वेगळे आहेत कारण त्या त्या देशाची भाषा वेगळी आहे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या रेट्यात देखील भाषेवर आधारित देशाचं वेगळेपण ते देश टिकवून आहेत आणि ते वेगळंच असलं पाहिजे म्हणून अत्यंत आग्रही आहेत.

म्हणूनच, भाषेपासून माणसाची ओळख वेगळी करता येत नाही.

आमचीही ओळख जगाला आहे ती आम्ही मराठी भाषिक म्हणूनच. ती ओळख आपणच जपली पाहिजे. दुसरे कोणी येऊन ती ओळख जपणार नाहीत. आपल्यालाच त्यात लक्ष घालायला पाहिजे. आपल्यालाच त्यासाठी प्रयत्न करावे लागतील. भारतीय राज्यघटनेनंही माणसाचं अस्तित्व हे भाषेवर आहे हे बरोब्बर ओळखून भाषावार प्रांतरचना केली. त्यात असं मानलं की एक भाषा असेल तर ती राज्यं सांस्कृतिकदृष्ट्या एक रहातील. एका भाषेत बोलतील, एका भाषेत व्यवहार करतील, एका भाषेत पुढे जाण्याचं स्वप्न पहातील. आपल्या भाषेचा विकास करतील आणि देशात जी विविधता आहे ती जपतील. अर्थात भाषावार प्रांतरचना सहजासहजी झालेली नाही. त्यासाठी देशात आणि आपल्या महाराष्ट्रात लढे झाले. लोकांनी आपल्या आयुष्याचं बलिदान दिलं, १०६ हुतात्मे झाले आणि मराठी माणसासाठी महाराष्ट्राची निर्मिती झाली. मराठी माणसाच्या अस्मितेचा मान राखला गेला.

इतिहासातून आपण आणखी एक गोष्ट शिकली पाहिजे.

माणसाचा इतिहास असं सांगतो की ज्या ज्या समाजांनी प्रगती केली, यशाची उत्तुंग शिखरं गाठली आणि आपल्या समाजाचा सर्वांगीण विकास केला त्यांची अस्मिता पक्की होती. दुसरं महायुद्ध झालं त्यावेळची अमेरिका घ्या किंवा युद्धाच्या अगोदरची जर्मनी घ्या किंवा व्हिएटनाम, कोरिया सारखी राष्ट्रं घ्या. एका भावनेनं, एका विचारानं हे समाज एकवटले होते. त्यांची अस्मिता जागृत होती, पक्की होती.

अस्मिता म्हणजे मी कोण आहे ह्याची जाणीव. ज्याला प्रगती करायची आहे त्याला किंवा तिला आधी मी कोण आहे ह्याची जाणीव हवी. मी मराठी आहे, माझं घर मराठी आहे, माझी भाषा मराठी आहे, माझी संस्कृती मराठी आहे, माझा इतिहास मराठी आहे, माझी वृत्ती मराठी आहे, माझं भविष्य मराठी आहे आणि माझं स्वप्नंही मराठीच आहे.

माणसाला भाषा कशी सापडली, माणसाचे पहिले शब्द कुठले, ते त्यानं कसे शोधले असतील, नंतर त्यानं भाषा कशी संपन्न केली असेल? ह्यावर खूप संशोधन झालं आहे आणि अजूनही ते चालू आहे.

ते काहीही असलं तरी एक गोष्ट नक्की की भाषा ही समाजाला घट्ट धरून ठेवते. समाजामध्ये एकीची भावना निर्माण करते. भाषा ही आपली ओळख आहे. भाषा हे आपलं अस्तित्व आहे. भाषा म्हणजेच मी आहे.

म्हणूनच, मराठी भाषा ही महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्राची जडणघडण मराठी भाषेमुळे झाली, मराठी भाषेच्या भोवती झाली.

त्यामुळेच देशाची स्थापना झाली तेंव्हा आपण भाषावार प्रांतरचना स्विकारली आणि मराठी भाषिकांचं राज्य म्हणजे महाराष्ट्र अशी महाराष्ट्राची घटनात्मक चौकटीतही ओळख झाली.

आज महाराष्ट्रात ६७ टक्के मराठी माणूस आहे, म्हणजे ज्यांची मातृभाषा मराठी आहे अशी महाराष्ट्रातील तीन माणसांपैकी दोन माणसं आहेत. महाराष्ट्राची स्थापना झाली तेंव्हा राज्यात मराठी माणूस ७५% टक्के होता. त्याअगोदर म्हणजे आजपासून शंभर वर्षापूर्वी मराठी माणूस महाराष्ट्रात ९५% टक्के होता आणि असंच चालू राहिलं तर २०५० पर्यंत मराठी माणूस ६०% टक्क्यांच्या खाली जाईल. मराठी ही ज्यांची मातृभाषा आहे अशी माणसं महाराष्ट्रात अल्पसंख्यांक होतील आणि ज्या माणसांची मातृभाषा मराठी आहे ती मराठीत किती बोलतील? त्यांची परिसरभाषा (म्हणजे त्यांच्या आसपास जी भाषा बोलतात, ज्या भाषेचा वापर होतो किंवा मराठी मुलांच्या कानावर कुठली भाषा पडते) किती प्रमाणात मराठी असेल? शाळेत, कार्यालयीन कामकाजात, न्यायदानाच्या कामात, बॅन्केत, रस्त्यावर, दूरदर्शनवर किती मराठी राहील? ह्या सर्वांची उत्तरं आत्ता देणं कठीण आहे.

महाराष्ट्रात मराठी टक्का कमी व्हायला काही कारणं आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळण्याआधी तीस-चाळीस वर्ष महाराष्ट्रात कारखानदारीची सुरुवात झाली. महाराष्ट्रात म्हणजे मुख्यत: मुंबईत. हे कारखाने मुंबईतच का आले? ह्या कारखान्यासाठी भांडवल घेऊन त्याची गुंतवणूक मुंबईतच का केली गेली? काही लोक ह्याचं एक सोपं उत्तर देतात की मुंबईला बंदर आहे म्हणून मुंबईत कारखाने आले. हे चूक नाही पण फक्त बंदर एव्हढंच कारण नाही, कारण मुंबईबरोबरच तेंव्हा कोलकता, चेन्नई, कालिकत, विशाखापट्टणम अशी बंदरं होतीच. मग मुंबईच का? मुंबईतच कारखानदारी का वाढली?

मुंबई आणि त्याच्या आसपास कारखानदारी वाढण्याचं मुख्य कारण होतं ते म्हणजे इथं असणारा शिक्षित, कुशल आणि कष्टकरी कामगार. १९२०-१९३० च्या सुमारास महाराष्ट्र आणि इतर ठिकाणची तुलना केली तर हे लक्षात येईल की महाराष्ट्रात

शिक्षणाचं प्रमाण देशाच्या इतर भागापेक्षा खूप होतं. दुसरं म्हणजे महाराष्ट्रात असणारं सामाजिक वातावरण. महात्मा फुल्यांच्या काळापासून म्हणजे १८६०-७० च्या दशकापासून, आणि नंतर शाहू महाराजांच्या राजकीय

आशिर्वादानं, लोकमान्य टिळक आणि त्यांच्या बरोबर असलेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यकर्त्यांमुळे महाराष्ट्रात समाज प्रबोधनाचं एक युग निर्माण झालं. त्यानं शिक्षणाचा प्रसार झाला, समाजमनाच्या कक्षा रूंदावल्या आणि महाराष्ट्रात भांडवल येणं, त्यामुळे कारखानदारी सुरु होणं ह्याला वाव मिळाला.

जगात सर्वत्र असं झालं आहे. सुरुवात पैसा टाकून होत नाही. सुरुवात सामाजिक परिस्थितीनं होते. तो परिस्थिती योग्य असावी लागते. हे पहा नुसता पैसा काहीच करत नाही पण ते वापरणारी माणसं कुठे आहेत, ती किती सक्षम आहेत ह्यावर किती प्रगती होते, उद्योग किती पुढे जातात हे ठरतं. तेंव्हा सामाजिक विकास आधी व्हावा लागतो, समाज आधी तयार असावा लागतो आणि मग आर्थिक विकास होतो. भांडवलदारी, कारखानदारी पोकळीत सुरु होत नाही. ज्या समाजात शिक्षण आहे, आधुनिकता आहे, पुरोगामी विचार आहे, प्रबोधनाची प्रक्रिया झालेली आहे तिथेच कारखानदारी मूळ पकडते आणि तिथंच आधुनिकता विस्तारते.

महाराष्ट्रात नेमकं हेच झालं. भांडवल आलं की मग कुशल-अकुशल कामगारांची गरज लागली आणि ती लागली की मोठ्या प्रमाणावर मुंबईत महाराष्ट्रातून आणि देशातून लोक स्थायिक होऊ लागले. मुंबई देशातील आर्थिक आणि औद्योगिक घडामोडींचं केंद्र बनली. पुढे तो विस्तार ठाणे, पुणे अशा ठिकाणी झाला आणि आर्थिक प्रगतीचे वारे महाराष्ट्रात वाहू लागले. नोकरी, उद्योग-उदीमाच्या संधी निर्माण झाल्या. सहाजिकच मुंबई आणि महाराष्ट्राकडे लोकांचा ओघ सुरु झाला. लोक आपली भाषा घेऊन आले आणि अगोदरच समाज प्रबोधनाची आणि लोकांना सामावून घेण्याची सवय असणारा महाराष्ट्र सर्वांसाठी एक संधी बनला.

हे झालं ह्याचा महाराष्ट्राला अभिमान आहे, आम्हालाही आहे. पण ते झाल्यानंतर हळूहळू मराठी टक्का कमी होऊ लागला. मुंबई आणि आसपासच्या परिसरावरचा मराठी प्रभाव कमी होऊ लागला.

मराठी माणूस सर्वांना सामावून घेणारा आहे, उदारमतवादी आहे आणि त्यामुळे महाराष्ट्रात लोक येत राहिले. महाराष्ट्रात मराठी खेरीज इतर भाषा बोलणारे लोकही वाढू लागले. त्याचा परिणाम मराठीवरही झाला. मराठीही बदलत गेली.

एक मात्र खरं की भाषा म्हणजे काही दगड-माती, डोंगर नाही की ज्यात काही बदलच होत नाही. खरं म्हणजे त्यातही काही वर्षांनं बदल होतो. भाषा ही बदलत जाते. जसं शिवाजी महाराजांच्या काळातलं मराठी किंवा त्याच्याही नंतरचं महात्मा फुले ह्यांच्या काळातलं मराठी आणि आत्ताचं मराठी ह्यात फरक आहे. त्यामुळे भाषा बदलते हे खरंच आहे आणि ते आपण स्विकारायलाही पाहिजे. सध्या मोबाईल मुळे किंवा इंटरनेटमुळेही भाषा बदलतीय पहा. त्यामुळे ती बदलत जाणार, काळ बदलतो तसे त्यात बदल होत रहाणार हे आपण मान्य करायला पाहिजे.

पण, बदलणं आणि कमी होणं किंवा बदलणं आणि संपत जाणं ह्यात फरक आहे. असं होत राहिलं तरी मराठीपणा संपायचं काहीच कारण नाही. लंडनला जगभरातून लोक आले, पॅरिसला आले, बिजिंगला आले म्हणून तिथला स्थानिक सांस्कृतिक प्रभाव कमी झाला नाही. आम्हालाही विकास हवा आहे, जगाला जोडलं जायला हवं आहे, जगाशी व्यापार हवा आहे, प्रगती हवी आहे पण त्यासाठी आमची मराठी पुसली जाण्याची गरज नाही. त्यासाठी आम्ही आमची भाषा, आमची ओळख, आमची अस्मिता, आमची थोर परंपरा विसरणार नाही, हरवणार नाही, सोडणार नाही. मराठी टिकवून, मराठीला मोठं करत आम्ही जगाचे नागरिक बनणार.

आमची जगाबरोबर व्यापार करण्याची भाषा भले असेल इंग्रजी पण मन असेल मराठी. इंग्रजीची खिडकी असेल पण डोळे असतील मराठी. योजना करू आम्ही जगाशी स्पर्धा करण्याची पण त्याची योजना आखू मराठीतच. त्याचं स्वप्नही पाहू मराठीत, आणि त्याचा विजयही साजरा करू मराठीतच.

त्यामुळे एक नक्की की आपण लक्ष दिलं नाही, काही ठोस केलं नाही तर मराठी भाषा महाराष्ट्रातच टिकणार नाही. हळूहळू करत तिचं अस्तित्व संपत जाईल आणि कदाचित असं होईल की ती एक फार कमी वापरली जाणारी भाषा होईल, नगण्य होईल किंवा जवळजवळ संपत जाईल. आमची भाषा नगण्य म्हणजे आम्ही नगण्य, ते आम्हाला कसं चालेल.

अशी मराठी भाषा संपणं आपल्याला चालेल का? अशी मराठी भाषा कमी होणं आपल्याला परवडणारं आहे का?

भाषेविषयी असलेला भावनात्मक मुद्दा थोडा बाजूला ठेवून अगदी रोकडा व्यवहार म्हणूनही मराठी भाषा संपलेली

## शब्दसाधना

आपल्याला चालेल का? असा प्रश्न विचारण्याची आज गरज आहे. मुळात एखादी भाषा का संपते, का नष्ट होते, ती तशी झाल्यामुळे काय होतं, त्याचे काय परिणाम होतात हे पहायला हवं आहे. एके ठिकाणी फार सुंदर म्हटलं आहे - भाषा विसरली जाते जेंव्हा मुलं ती भाषा विसरतात तेंव्हा.

फेब्रुवारी २०११ च्या मसायंटीफीक अमेरिकनफ च्या अंकात लेरा बोरोडिट्सकी नावाच्या शास्त्रज्ञ बाईंनी त्यांच्या कुडरपर्सीरसशी ढ्हरशिी ढर्हेीसहीं ह्या लेखामध्ये असं म्हटलंय की भाषा तुमचा विचार ठरवते. तुम्ही कुठली भाषा वापरता ह्यावर तुम्ही काय विचार करता हे बरचसं ठरतं. म्हणून त्या लेखात त्या म्हणतात की माणसानं त्याच्या भाषेतच विचार करायला हवा, तोच त्याचा खरा विचार असतो.

हे खरं आहे. महाराज, तोफेच्या तोंडचे आवाज ऐकल्याशिवाय मी लढाई चालूच ठेवेन असं वाक्य अगदी चांगल्या चिनी भाषेत भाषांतरित केलं तरी मराठी माणसाच्या अंगात जे स्फरण चढेल तसं चिनी माणसाच्या अंगात चढेल का? किंवा पंढरपूरला, चंद्रभागेच्या काठाला विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल  ह्या गजराचं नेमकं भाषांतर तुम्ही कसं करणार? आणि, मराठी माणसाच्या मनात त्यानं जे उमटेल ते बाकीच्यांच्या मनात उमटेल का?

तर, नाही. त्यामुळे माणूस म्हणजे त्याची / तिची भाषा हे पक्कं. म्हणून मराठी माणूस टिकवायचा असेल तर मराठी भाषा टिकवायला हवी.

मराठी नुसती टिकवायला हवी असं नाही तर ती वाढवायला हवी, जसं -

इथल्या मराठी मुलामुलींनी वैभवशाली महाराष्ट्राचं स्वप्न मराठीत पहावं आणि असं स्वप्न पहाण्याची सवय त्यांनी त्यांच्या पुढच्या पिढीला लावावी. मराठीतील कादंबरीला साहित्याचं नोबेल मिळावं. मराठी चित्रपटाला ऑस्करसारखा पुरस्कार मिळावा, आणि मिळत रहावाच पण एके वर्षी जागतिक चित्रपट महोत्सवात मराठी चित्रपटांचेच फक्त विशेष प्रदर्शन व्हावे. मराठी मध्ये मूलभूत शास्त्रीय संशोधन व्हावं जे इंग्रजीसह इतर भाषांमध्ये भाषांतरित करण्यासाठी चढाओढ व्हावी.

मराठी किल्ले, महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळे, लेणी, जंगले, समुद्रकिनारा जगाच्या पर्यटनाच्या नकाशावर यावा. जगाच्या महत्वाच्या शहरात मराठी उद्योजकांचं विशेष केंद्र असावं.

आपली अनेक गुणी, कर्तबगार मराठी मुलं फार मोठ्या प्रमाणात जगात काम करत आहेत, वेगवेगळ्या क्षेत्रात मर्दुमकी गाजवत आहेत त्या सर्वांना महाराष्ट्रात यावं असं वाटावं, त्यांनी यावं आणि इथे महाराष्ट्रात, महाराष्ट्रासाठी संशोधन करावं, उद्योग काढावेत. जगातल्या पहिल्या १० विद्यापीठांमध्ये मराठी विद्यापीठ असावं. जगातल्या महत्वाच्या विद्यापीठात मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी कला ह्यावर संशोधन व्हावं. निवडक मराठी साहित्य जगातल्या महत्वाच्या भाषांत यावं आणि मराठीनं देखील इतर भाषेतील साहित्य भाषांतरीत करण्याचं काम करावं. जगातल्या प्रगत देशांमधून मराठी तंत्रज्ञांना, संशोधकांना, तज्ञांना, संस्थांना मार्गदर्शनासाठी बोलावलं जावं. मराठी बॅन्केच्या जगभरात शाखा व्हाव्यात. महाराष्ट्रानं जगाला मार्ग दाखवावा.

हो, महाराष्ट्रानं जगाचं नेतृत्व करावं, जगापुढच्या प्रश्नांना महाराष्ट्रातून उत्तरं मिळावीत महाराष्ट्राकडून उत्तरं मिळावीत..

हा मराठी माणसाच्या अस्तित्वाचा प्रश्न असल्यानं तो राजकारणाचा आणि म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महाराष्ट्राच्या विकासाच्या समग्र योजनेचा विषय आहे.

भाषा संपली तर एक इतिहास संपतो. त्या भाषेतलं ज्ञान हरवून जातं. भाषा संपली तर एक संस्कृती संपते. शेकडो, हजारो वर्षांची एक परंपरा संपते. एका मोठया समाजाची ओळख हरवते. कित्येक पिढ्यांनी जमा केलेलं संचित नष्ट होतं. त्या भाषेतील साहित्य, कला, संगीत, म्हणी, चालीरिती, खेळ, खाद्य-पदार्थ हे सारं संपून जातं..

एव्हिन्की ही अशीच एक संपत चाललेली भाषा. ह्या भाषेतील कवयत्री अलीटेट नेमतुश्कीन ह्यांनी एक सुंदर कविता केली आहे, स्वत:च्या भाषेवर. त्याचा स्वैर अनुवाद -

माझी भाषा मी कशी विसरू?  
मी जर माझी भाषा विसरले,  
आणि त्या भाषेतील गाणी विसरले  
तर माझ्या डोळ्यांचा आणि कानांचा उपयोग काय?  
आणि, माझ्या तोंडाचा तरी काय उपयोग?  
मी जर माझ्या मातीचा वास विसरले,  
आणि तिच्याशी इमान सोडलं  
तर माझ्या हातांचा उपयोग काय?  
आणि, माझ्या जगण्याचा तरी काय उपयोग?  
माझी भाषा बरोबर नाही, ती कुचकामी आहे  
ह्या मूर्ख कल्पनेवर मी विश्वास तरी कशी ठेवू?

## शब्दसाधना

जर माझ्या आईचे मरतानाचे अखेरचे शब्द
हे माझ्या, माझ्या भाषेतले, एव्हिन्कीतले असतील तर
अलीटेट नेमतुश्कीन, एव्हिन्की भाषेतील कवयत्री

जगाची भाषा आणि आमची भाषा

सध्या जगात जागतिकीकरणाचे आणि आधुनिकीकरणाचे वारे वहात आहेत. प्रत्येकाला वाटणं स्वाभाविक आहे की आपण जगाशी जोडले गेलो पाहिजे, आपला विकास करायचा असेल तर आपल्याला जगाची भाषा शिकायला हवी. जग ज्या ज्या भाषांमध्ये विचारांची देवाणघेवाण करतं, व्यापार करतं, राजकारण करतं त्या भाषांमध्ये इंग्रजी भाषा आहे (आपल्याला हेही लक्षात ठेवायला हवं की किती लोक ही भाषा बोलतात हे पाहिलं तर इंग्रजी जर चौथ्या क्रमांकाची असेल तर मराठीही १५ व्या क्रमांकाची भाषा आहे

त्यामुळे आपण इंग्रजी शिकायला हवी ह्यात काहीच चूक नाही. काहीच गैर नाही. फक्त जगात पुढे जायचं म्हणून इंग्रजी शिकायची आणि म्हणून मराठीचा दुस्वास करायचा ह्याची गरज नाही. ते करू नये.

आपल्याला, आपल्या मुलांना मराठी आणि इंग्रजी ह्या दोन्ही भाषांवर प्रभुत्व असायला हवं. अशीच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचीही भूमिका आहे.

जगात चीन नवनव्या दिशा पादाक्रांत करीत आहे पण त्यांनी चीनी, मंडारीन ह्या भाषांचा दुस्वास चालवला नाही. जर्मनी, फ्रांस, जपान ह्यासारखे देशही प्रगती करीत आहेत पण त्यांनी त्यांची भाषा सोडलेली नाही. घट्ट धरून तर ठेवली आहेच पण त्यात आणखी काय काय करता येईल, आपली भाषा कशी संपन्न, समृद्ध करता येईल आणि आपल्या भाषेत जगाचं ज्ञान कसं आणता येईल ह्याचाही त्यांचा प्रयत्न चालू आहे. आपणही तसं करण्याची गरज आहे.

नुसतं मराठी वाचवा, मराठी वाचवा असं म्हणत बसण्यात काही अर्थ नाही. त्यासाठी मराठी वातावरण महाराष्ट्रात निर्माण करावं लागेल. ते कसं करायचं हेच या विभागात सविस्तर सांगत आहोत.

## मास्तर...

विद्यालयाच्या जागेपायी
कुणीच इथं भांडलं नाही
अन..देवालयाच्या जागेपायी
रक्त इथं आडलं नाही..

माझाच देव मोठा म्हणण्यात
रक्ताच्या नद्या वाहील्या
ज्ञानगंगा कोरडी पडत
ओसाड शाळा झाल्या...

शाळा अजुनही ओसाडच
पडक्या,तुटक्या भिंती
गरीब माझ्या देशामधी
उभी मंदिरं सोन्याची...

शाळेची इथल्या दानपेटी
कधीच भरली नाही
अन् मंदिराच्या दानपेटीला
ओझं सोसलं नाही...

शाळेतला पालक मेळावा
पालकांवाचून राहून गेला
देवालयात चेंगराचेंगरीत
माणुस तुडवून मेला...

विद्येचं ज्ञान देऊन
गुरूजी गरीबच राहीला
अन्फअंधभक्तांचंफ दान घेऊन
पुजारी धनवान झाला...

खरंतर धर्म नावाचं पुस्तक
शाळेत कधीच उघडत नाही
अन् धर्माच्या नावाशिवाय
देशात पानही हालत नाही...

मास्तर...

**प्रकाश चौथरे**
तृतीय वर्ष यांत्रिकी अभियांत्रिकी